दैनिक अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७१ । मंगळवार, दि.१४ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## जेजुरीत वारीवर काळाचा घाला!

### दिंडीतील शिधा वाहून नेणाऱ्या ट्रकची वारकऱ्यांना धडक

### तीन महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू, १६ हून अधिक जखमी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यावर रविवारी सकाळी दुर्दैवाचा काळा डाग उमटला. जेजुरीजवळील भोंगळे मळा परिसरात दिंडीतील शिधा वाहून नेणाऱ्या ट्रकने वारकऱ्यांच्या समूहाला जोरदार धडक दिल्याने तीन महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर १६ ते १८ वारकरी जखमी झाले. या दुर्घटनेमुळे संपूर्ण वारकरी संप्रदायावर शोककळा पसरली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवड मुक्कामानंतर जेजुरीकडे मार्गस्थ झाली होती. वारकरी पदयात्रा करत असताना दिंडीसोबत असलेल्या शिधा वाहून नेणाऱ्या ट्रकचा चालक अचानक वाहनावरील ताबा गमावल्याने ट्रक थेट वारकऱ्यांच्या अंगावर गेला. या भीषण धडकेत अनेक वारकरी गंभीर जखमी झाले.



जेजुरी येथील टोल नाक्याजवळ झालेल्या भीषण अपघातात ३ वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने 'आनंदी हॉस्पिटल'ला भेट देऊन जखमी वारकऱ्यांची विचारपूस केली.

या अपघातात राजश्री शंकर भोसले, माधवी राजाराम सरवडे आणि नंदा पवार या तीन महिला वारकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. तिन्ही महिला सांगली जिल्ह्यातील असून वारीसाठी पालखीसोबत सहभागी झाल्या होत्या. जखमींना तातडीने जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.प्राथमिक माहितीनुसार, संबंधित ट्रक नांदेड जिल्ह्यातील असून चालकाचे वय सुमारे ७० वर्षे आहे. चालकाने तापाच्या गोळ्या घेतल्यामुळे त्याला ग्लानी आल्याने वाहनावरील नियंत्रण सुटल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपघाताची सखोल चौकशी सुरू असून नेमके कारण शोधले जात आहे.दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. दिंडीतील वाहनानेच वारकऱ्यांना धडक देऊन तीन वारकऱ्यांचा मृत्यू होणे अत्यंत वेदनादायी आहे. जखमी वारकरी लवकर बरे व्हावेत, ही विठुरायाच्या चरणी प्रार्थना. या अपघाताची सखोल चौकशी करून भविष्यात अशी घटना घडणार नाही यासाठी प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात आणि वारकऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.या दुर्घटनेनंतर वारी मार्गावरील सुरक्षाव्यवस्थेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी अधिक कडक नियोजनाची मागणी होत आहे.

## महत्वाचे...

### दिंडीतील महिला वारकऱ्याचा मृत्यू!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** त्र्यंबकेश्वरहून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या संत निवृत्तीनाथ दिंडी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या ६० वर्षाच्या महिलेचे सोमवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. संत निवृत्तीनाथ महाराज यांची पालखी त्र्यंबकेश्वर येथुन २९ जून रोजी पंढरपुरच्या दिशेने मार्गस्थ झाली. या काळात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये या करता पालखी सोबत पोलीस बंदोबस्त, आरोग्य विभाग तसेच विविध सामाजिक संस्थांचे पथके कार्यरत आहे.नाशिकच्या वेशीनंतर पालखी अहिल्यानगर मार्गे पंढरपुरकडे मार्गस्थ होणार आहे. वारीचा अहिल्यानगर परिसरात बाजार समितीच्या आवारात रविवारी मुक्कामी होती. यावेळी पालखीत सहभागी झालेल्या सुमनबाई मधुकर कांडेकर (६०, रा. जातेगाव, नाशिक) या अन्य नातेवाईकांबरोबर कानिफनाथ गढीवर दर्शन घेण्यासाठी गेल्या होत्या. दर्शनानंतर रात्री त्या पुन्हा पालखी सोहळ्यात सहभागी झाल्या. सोमवारी पहाटे आरतीसाठी सुमनबाई उठल्या नाहीत. त्या बेशुध्द असल्याचे त्यांच्या नातेवाईकांच्या लक्षात आले. त्यांनी संत निवृत्तीनाथ देवस्थानचे अध्यक्ष राहुल महाराज साळुंखे यांना माहिती दिल्यावर त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याचे सांगितले.

## सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाला राष्ट्रवादीतूनच आक्षेप

### राष्ट्रीय सचिवाने पदाधिकाऱ्यांना पाठवली कायदेशीर नोटीस



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** एकीकडे शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महायुतीत सहभागी होणार असल्याच्या चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीत देखील सर्वकाही आलबेल असल्याचे दिसून येत नाही.यापूर्वी, अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून प्रफुल पटेल यांचे नाव चर्चेत आल्यानंतर, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून त्यास विरोध झाला होता. त्यानंतर, सुनेत्रा पवार यांच्याकडेच पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली. २६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीच्या सर्वसाधारण सभेत प्रफुल पटेल यांच्याकडूनच ही घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता या निवडीला आक्षेप घेत सुनेत्रा पवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. मात्र, २८ जानेवारी रोजी विमान अपघातात अजित पवारांचे निधन झाले, त्यानंतर, राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणा केली. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्यास सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. त्यामुळे, सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, आता याच निवडीला राष्ट्रवादी पक्षातूनच आक्षेप घेण्यात आला आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षातील राष्ट्रीय अध्यक्ष पदावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील जेष्ठ नेते आणि राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी थेट वकिलांमार्फत नोटीस पाठवून प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पक्षाच्या अध्यक्षांसह वरिष्ठ नेत्यांना ९ जुलै रोजी त्यांनी ही नोटीस बजावली असून राष्ट्रीय अध्यक्ष पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने सुनेत्रा पवार, कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रपुल्ल पटेल आणि पक्षाचे सचिव म्हणून ब्रिजमोहन श्रीवास्तव **(उर्वरीत पान ४)**

## बेग टोळीच्या छत्राखाली गुन्हेगारीचा हैदोस

### आ. ओगले यांचा थेट आरोप; दुबैया हत्या प्रकरणावरून संतप्त श्रीरामपूर दुसऱ्या दिवशीही बंद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैया यांच्या भरदिवसा झालेल्या निर्घृण हत्येनंतर श्रीरामपूर तालुक्यातील जनक्षोभ आणखी तीव्र झाला असून, सलग दुसऱ्या दिवशीही शहरासह परिसरात कडकडीत बंद पाळण्यात आला. व्यापारी, नागरिक आणि सर्वपक्षीय नेते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. या आंदोलनात सहभागी झालेले आमदार हेमंत ओगले यांनी माध्यमांशी बोलताना श्रीरामपूरातील वाढत्या गुन्हेगारीसाठी बेग टोळी जबाबदार असल्याचा थेट आरोप करत प्रशासन आणि पोलिसांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दरम्यान आज तिसऱ्या दिवशीही श्रीरामपूर बंद पाळण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष करण ससाने यांनी स्पष्ट केले. उद्या बुधवारी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



महात्मा गांधी चौकात झालेल्या आंदोलनात आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, नगरसेविका वैशाली चव्हाण, प्रकाश चित्ते, रवी पाटील, राजेश अलघ यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आमदार ओगले यांनी सांगितले की, श्रीरामपूरात सक्रिय असलेल्या बेग टोळीची माहिती प्रशासन आणि पोलिस यंत्रणेला असूनही त्यांच्यावर प्रभावी कारवाई होत नाही. या टोळीमुळे व्यापारी, डॉक्टर, व्यावसायिक, महिला आणि सर्वसामान्य नागरिक भयभीत असल्याचा आरोप त्यांनी केला. ड्रग्स, गुंगीच्या गोळ्या, **(उर्वरीत पान ४)**

### प्रतिक्रिया

**आमदार हेमंत ओगले**
शहरात 'बेग टोळी'चा हैदोस सुरू आहे. व्यापारी, महिला आणि नागरिक असुरक्षित आहेत. या टोळीवर तातडीने मकोका लावून संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त करा.

**प्रकाश चित्ते**
हिंदुत्वाच्या नावावर राजकारण करणाऱ्यांनी आता हिंदू गुंडांपासूनच समाजाचे संरक्षण करावे. गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्यांवरही मकोका लावला पाहिजे.

**नगरसेविका वैशाली चव्हाण**
हत्या, घरफोड्या, महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. पोलिसांकडे तक्रारींची दखल घेतली जात नाही. नागरिक भयभीत आहेत.

**माजी आमदार भाऊसाहेब कांबळे**
राजकीय पोसणूक आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गुंडांचे धाडस वाढले. ड्रग्सच्या रॅकेटवर निर्णायक कारवाईची वेळ आली आहे.

**माजी खासदार सदाशिव लोखंडे**
दोन नंबरच्या धंद्यांनी श्रीरामपूरची शांतता हिरावली आहे. सर्व पक्षांनी एकत्र येऊन गुन्हेगारीचा कायमचा बंदोबस्त करावा.

**माजी आमदार भानुदास मुरकुटे**
गुन्हेगारांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे; मात्र बंदमुळे सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरू नये. आंदोलनाचा पर्यायी मार्ग स्वीकारावा.

## हायवेवर आयशरचा 'नागीण डान्स'

### ३७८ एमजी दारू पिऊन पळवतोय गाडी...!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** नाशिक-पुणे हायवेवर एका आयशर ट्रकने घातलेला धुमाकूळ आणि पोलिसांच्या थरारक कारवाईची चर्चा सध्या अहिल्यानगर जिल्ह्यात रंगली आहे. दारूच्या नशेत चक्क अवजड आयशर ट्रक नागमोडी पळवत महामार्गावर मृत्यूचा सापळा रचणाऱ्या एका २३ वर्षीय तळीरामाला घारगाव पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. शुक्रवारी (दि. १०) मध्यरात्री पावणेदहाच्या सुमारास 'डायल ११२' वर कॉल आला की, एक इसम दारूच्या नशेत आयशर ट्रक (क्र. चक-०५--च्-२३३३) वेडीवाकडी चालवत नाशिकच्या दिशेने जात आहे. माहिती मिळताच पोलीस कॉन्स्टेबल सतिश बिडगर आणि पथकाने बांबळेवाडी येथील हरियाणा ढाब्याजवळ हायवेवर सापळा रचला. रस्त्यावर 'नागीण डान्स' करत येणाऱ्या या ट्रकला पोलिसांनी शिताफीने बाजूला थांबवले. चालक महेश श्रीकिशन सुर्यवंशी (वय २३, रा. चिंचोळी शिवार, नाशिक) याला खाली उतरवून पोलिसांनी त्याची 'ब्रेथ नालायझर' मशीनद्वारे तपासणी केली. त्यावेळी त्याच्या शरीरात तब्बल ३७८.२ मिलिग्रॅम अल्कोहोलचे प्रमाण आढळून आले, जे नियमापेक्षा कित्येक पटीने जास्त आहे. याप्रकरणी घारगाव पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल केला असून, पोलीस हवालदार नारायण धोकरे पुढील तपास करत आहेत.

## वाहतुकीस अडथळा

### रस्त्यावरील धार्मिक स्थळांना पालिकेचा अल्टिमेटम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** : शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या रस्त्यावरील आणि पदपथांवरील धार्मिक स्थळांविरोधात अहिल्यानगर महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. संबंधित धार्मिक संस्था, ट्रस्ट आणि व्यवस्थापनांनी अतिक्रमण स्वतःहून हटवावे, अन्यथा नोटीस बजावल्यानंतर सात दिवसांच्या आत महापालिकेकडून थेट कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.महापालिकेच्या पाहणीत शहरातील अनेक प्रमुख रस्ते आणि पदपथांवर मंदिरे, दर्गे, मजार, चर्च, गुरुद्वारे तसेच इतर धार्मिक स्थळांचे अतिक्रमण असल्याचे आढळून आले आहे. या अतिक्रमणांमुळे नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही मार्ग काढताना अडचणी निर्माण होत आहेत.शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता सार्वजनिक रस्त्यांवरील अडथळे दूर करणे आवश्यक असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. यासंदर्भात जाहीर नोटीस प्रसिद्ध करून संबंधितांना अतिक्रमण स्वेच्छेने हटविण्याचे किंवा स्थलांतरित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत अतिक्रमण हटविले नाही तर सदर अतिक्रमण महापालिकेकडून हटविले जाईल.

## दोन कोटी ९३ लाखांचे खाद्यतेल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) कारवाईचा धडाका सुरूच असून, छत्रपती संभाजी नगर शहरात व पैठणमध्ये मिळून केलेल्या दोन कारवाईमध्ये २ कोटी ९३ लाख ३५ हजार ६०३ रुपये किंमतीचे खाद्यतेल वापरलेले असावे या संशयावरुन जप्त करण्यात आले. हे तेलाचा साठा पत्र्याच्या डब्यांमध्ये अस्वच्छ भागात केल्याचे समोर आले आहे.राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या 'सुरक्षित अन्न सुरक्षित महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत शनिवारी (११ जुलै) पैठण तालुक्यातील मे. बागारिया ग्रो प्रॉडक्ट्स आणि शहरातील मे. बागारिया व्हेजिटेबल प्रॉडक्ट्स प्रा. लि. या दोन व्यावसायिकांवर छापे टाकले. या कारवाईत संशयित निकृष्ट दर्जाचा खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला तसेच दोन्ही आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले. जप्त तेलाचे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत.तपासणीत प्रक्रिया करण्यात येणाऱ्या विभागातील यंत्रसामग्रीवर धूळ, जाळी, गंज आणि साचलेली घाण आढळली. फरशी, भिंती आणि परिसरही अत्यंत अस्वच्छ होता. त्याच ठिकाणी रॅन्सिड तेलाचे



टब ठेवलेले होते. बंद रिफायनरी आणि सुरू असलेला रिपॅकिंग विभाग एकाच आवारात असल्याने तेल दूषित होण्याचा गंभीर धोका असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले. वापरलेल्या टिन्समध्ये खाद्यतेलाचे रिपॅकिंग होत असल्याचेही तपासणीत स्पष्ट झाले. ही कारवाई सहाय्यक आयुक्त डी. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे, पी. एस. कुचेकर, पी. एस. अजिंठेकर आणि योगेश चिभडे यांच्या पथकाने केली. या कारवाईत रिफाइंड पाम, सोयाबीन, कपाशी तसेच अज्ञात वनस्पती तेलाचा मोठा साठा जप्त करण्यात आला. एकूण २.९३ कोटी रुपयांचा संशयित निकृष्ट दर्जाचा खाद्यतेलाचा साठा ताब्यात घेऊन त्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

## ढाकणे सहकारी साखर कारखान्यावर आरसीसी कारवाई

- अहिल्यानगर जिल्ह्यात २२ पैकी २१ कारखान्यांनी केली शेतकऱ्यांची देयके अदा
- तीन कारखान्यांनी ९५ टक्क्यांहून अधिक रक्कम दिली
- प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाची माहिती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील सन २०२५-२६ च्या गाळप हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या एफआरपी थकबाकीबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहिल्यानगर यांनी शिवसेनेचे कार्यकर्ते अभिजित पोटे यांच्या निवेदनाला दिलेल्या उत्तरानुसार, जिल्ह्यातील २२ साखर कारखान्यांपैकी १९ कारखान्यांनी शंभर टक्के एफआरपी अदा केली असून, तीन कारखान्यांनी ९५ टक्क्यांहून अधिक देयके दिली आहेत. सध्या केवळ एका साखर कारखान्यावर आरआरसी आदेश जारी करण्यात आला आहे.



पत्रातील माहितीनुसार, बबनराव ढाकणे सहकारी साखर कारखाना, सुमननगर (ता. शेवगाव) याच्यावर सुमारे २,२२४.६५ लाखांच्या थकबाकीबाबत २७ मे २०२६ रोजी आरआरसी आदेश काढण्यात आला होता. मात्र, संबंधित कारखान्याने त्यानंतर एफआरपीप्रमाणे रक्कम अदा केल्याची माहिती दिली असून, त्याची खातरजमा करण्यासाठी विशेष लेखापरीक्षकांकडून तपासणी सुरू आहे.तसेच कुकडी सहकारी साखर कारखाना, पिंपळगाव पिसा (ता. श्रीगोंदा) यांनीही थकीत रक्कम अदा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे कळविले आहे. एनसीडीसीकडून कर्ज मंजूर झाल्यानंतर उर्वरित एफआरपी शेतकऱ्यांना दिली जाईल, असे कारखान्याने प्रशासनाला कळविले आहे. **(उर्वरीत पान ४)**

**पत्रातील माहितीनुसार, बबनराव ढाकणे सहकारी साखर कारखाना, सुमननगर (ता. शेवगाव) याच्यावर सुमारे २,२२४.६५ लाखांच्या थकबाकीबाबत २७ मे २०२६ रोजी आरआरसी आदेश काढण्यात आला होता. मात्र, संबंधित कारखान्याने त्यानंतर एफआरपीप्रमाणे रक्कम अदा केल्याची माहिती दिली असून, त्याची खातरजमा करण्यासाठी विशेष लेखापरीक्षकांकडून तपासणी सुरू आहे.**

## लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख महिला बाद!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'तून आतापर्यंत तब्बल ९२ लाख महिलांची नावे वगळण्यात आली आहेत. केवळ एक महिन्यापूर्वी सरकारने ८० लाख लाभार्थी कमी झाल्याचे सांगितले होते, मात्र आता हा आकडा थेट ९२ लाखांवर पोहोचला आहे. मूळ २.४ कोटी लाभार्थ्यांच्या तुलनेत ही घट तब्बल ३८ टक्के एवढी मोठी आहे. केवळ तांत्रिक अडचणींमुळे नव्हे, तर ई-केवायसी न करणे, उत्पन्नाची मर्यादा ओलांडणे आणि वयाचे निकष न बसणे यांसारख्या विविध कारणांमुळे ही मोठी कपात करण्यात आली आहे. याशिवाय सुमारे १४ हजार पुरुषांनी या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला होता, त्यामुळे त्यांनाही या योजनेतून वगळण्यात आले आहे. निकषांमध्ये न बसणाऱ्या आणि आवश्यक प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने बाहेर काढण्यात आले आहे. **(उर्वरीत पान ४)**

### 'कॅग'ने ओढले ताशेरे...

एकीकडे लाभार्थ्यांची संख्या कमी होत असतानाच, दुसरीकडे 'कॅग'ने शुक्रवारी एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, लाडकी बहीण योजनेवर होणाऱ्या प्रचंड खर्चामुळे महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा ताण येऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चाचे कोणतेही ठोस समर्थन करता येणार नाही, असे 'कॅग'ने आपल्या अहवालात नमूद केले आहे. महिला कल्याणासाठी राज्याचा होणारा खर्च २०२३-२४ मध्ये केवळ २६१.७८ कोटी रुपये होता. मात्र, २८ जून २०२४ रोजी 'लाडकी बहीण योजने'ला मंजुरी मिळाल्यानंतर, २०२४-२५ मध्ये हा खर्च थेट ३३ हजार ५१४ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

# बुटात लपलेली प्रश्नपत्रिका... आणि शिक्षण व्यवस्थेचे उघडे पडलेले तळवे!

**“६ लाख शिक्षकांचे भविष्य अवघ्या ८ हजारांत विकले जाणे ही केवळ गुन्हेगारी नव्हे, तर राज्याच्या परीक्षा व्यवस्थेच्या दिवाळखोरीची घोषणा आहे....”**

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा ही केवळ एक स्पर्धा परीक्षा नाही. ती लाखो युवक-युवतींच्या आयुष्याला दिशा देणारी प्रक्रिया आहे. शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून अनेक वर्षे अभ्यास करणाऱ्या उमेदवारांसाठी ही परीक्षा म्हणजे भविष्याचा पाया असतो. परंतु आज त्या पायालाच भ्रष्टाचाराने इतके पोखरले आहे की, अवघ्या ८ हजार रुपयांसाठी सहा लाखांहून अधिक उमेदवारांचे भविष्य विकले जाऊ शकते, हे वास्तव केवळ धक्कादायक नाही; ते संपूर्ण राज्याच्या प्रशासकीय आणि नैतिक व्यवस्थेचे अपयश आहे.

या प्रकरणातील सर्वात भयावह बाब म्हणजे पेपर लीक करण्यासाठी कोणत्याही अत्याधुनिक हॅकिंगची किंवा डिजिटल सायबर हल्ल्याची गरज पडली नाही. प्रश्नपत्रिका बुटाच्या इनसोलमध्ये लपवून छापखान्याबाहेर नेण्यात आली. म्हणजे कोट्यवधी रुपयांची सुरक्षा व्यवस्था, माजी सैनिकांचा पहारा, राज्याबाहेरील गुप्त छपाई, गोपनीयता... या सगळ्यांचा पराभव एका साध्या बुटाने केला.

हा प्रकार व्यवस्थेच्या सुरक्षेवरच नव्हे, तर तिच्या विचारशून्यतेवरही प्रश्न उपस्थित करतो. सुरक्षा म्हणजे फक्त गेटवर तपासणी नव्हे; तर प्रत्येक टप्प्यावर जोखीम ओळखण्याची क्षमता असते. कर्मचाऱ्यांचे कपडे तपासले, पण बूट तपासले नाहीत. सीसीटीव्ही बसवले, पण ते सुरू नव्हते. प्रश्नपत्रिकेचे चार वेगवेगळे संच छापले, पण तेच चारही संच सलग तीन दिवस बाहेर गेले आणि कोणालाही संशय आला नाही. यापेक्षा मोठे प्रशासकीय अपयश कोणते असू शकते?

यापेक्षाही गंभीर प्रश्न म्हणजे अवघ्या ८ हजार रुपयांत एका कर्मचाऱ्याने स्वतःचा प्रामाणिकपणा विकला. इतक्या क्षुल्लक रकमेपुढे लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचे मोल शून्य ठरले. यामध्ये केवळ एका कर्मचाऱ्याचा दोष नाही; तर वर्षानुवर्षे रुजलेल्या भ्रष्ट मानसिकतेचे दर्शन आहे. “पकडले गेलो नाही, तर सर्व काही चालते,“ ही मानसिकता आता समाजाच्या प्रत्येक स्तरावर पोहोचली आहे.

या घोटाळ्याचा सूत्रधार बिजेंद्र गुप्ताचा पॅटर्न अधिक धोकादायक आहे. त्याने एखाद्या परीक्षेला लक्ष्य केले नाही; तर प्रश्नपत्रिका छापणाऱ्या यंत्रणेलाच लक्ष्य केले. म्हणजे भविष्यात कोणत्याही राज्यातील कोणतीही परीक्षा त्याच्या जाळ्यात अडकू शकते. ही बाब केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून देशाच्या परीक्षा व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे.

गेल्या काही वर्षांत पेपरफुटीची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. टीईटी, आरोग्य विभाग, पोलीस भरती,




विविध स्पर्धा परीक्षा, नीट... प्रत्येक वेळी सरकार चौकशी समिती नेमते, आरोपींना अटक होते, काही अधिकारी निलंबित होतात आणि काही दिवसांनी सर्व काही पूर्ववत होते. मात्र, प्रत्येक पेपरफुटीनंतर हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक वर्ष कायमचे निघून जाते. त्याची भरपाई कोण करणार?

शिक्षक होण्यासाठी अभ्यास करणाऱ्या उमेदवारांचे नुकसान केवळ आर्थिक नसते. अनेक उमेदवार नोकरी सोडून अभ्यास करतात, कुटुंबाकडून कर्ज घेतात, कोचिंग क्लासेसची फी भरतात, मानसिक ताण सहन करतात. परीक्षा रद्द झाली की त्यांचे वय वाढते, संधी कमी होतात आणि आत्मविश्वास खचतो. या मानसिक नुकसानीचा हिशेब कोणत्याही चौकशी अहवालात नसतो.

सरकारने आता उच्चस्तरीय समिती नेमली आहे. संगणकाधारित परीक्षा, डिजिटल प्रश्नपत्रिका वितरण, एन्क्रिप्टेड प्रणाली, बायोमेट्रिक नियंत्रण अशा पर्यायांवर विचार सुरू आहे. हा निर्णय स्वागतार्ह आहे; पण तंत्रज्ञान हेच अंतिम उत्तर नाही. कारण भ्रष्टाचार तंत्रज्ञानात नसतो, तो माणसाच्या मनात असतो. डिजिटल प्रणालीही प्रामाणिक माणसांशिवाय सुरक्षित राहू शकत नाही.

यापुढे परीक्षा व्यवस्थेत केवळ तांत्रिक सुधारणा नव्हे, तर उत्तरदायित्वाची कठोर साखळी निर्माण करावी लागेल. प्रश्नपत्रिका छपाईपासून वितरणापर्यंत प्रत्येक टप्प्याची स्वतंत्र लेखापरीक्षा, सतत कार्यरत सीसीटीव्ही, कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निगराणी आणि दोषींना जलदगती न्यायालयातून कठोर शिक्षा ही आता काळाची गरज आहे. पेपरफुटी हा केवळ फौजदारी गुन्हा न मानता, देशाच्या मानवी संसाधनांवरील हल्ला म्हणून पाहण्याची वेळ आली आहे.

लोकशाहीची खरी ताकद संसदेत किंवा मंत्रालयात नसते; ती वर्गखोलीत घडणाऱ्या शिक्षकात असते. आणि त्या शिक्षकाची निवडच जर भ्रष्टाचाराच्या पायावर होणार असेल, तर उद्याच्या पिढीकडून प्रामाणिकपणाची अपेक्षा करण्याचा नैतिक अधिकार समाज गमावून बसेल.

बुटात लपवलेली प्रश्नपत्रिका ही फक्त काही कागदपत्रे नव्हती; ती महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासाची चोरी होती. हा विश्वास पुन्हा मिळवायचा असेल, तर आरोपींना अटक पुरेशी नाही; तर अशी व्यवस्था उभी करावी लागेल, जिथे कोणालाही पुन्हा कधीही ८ हजार रुपयांत सहा लाख विद्यार्थ्यांचे भविष्य विकत घेण्याची हिंमत होणार नाही.

# पोहेगाव ते झगडेफाटा रस्ता बनलाय मृत्यूचा सापळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : शिकार करण्यासाठी पारधी फाशे केलेली जाळे लावतो. आणि त्या फाशामध्ये सावज शिकार होते. अगदी याच पद्धतीने रांजणगाव देशमुख ते झगडे फाटा या रस्त्याची अवस्था झाली आहे. या रस्त्याने प्रवास करत असताना त्या सावजाप्रमाणेच शिकारी खड्ड्यांची शिकार होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. हा रस्ताच मुळात मृत्यूचा सापळा बनला आहे.

पोहेगाव ते झगडे फाटा या दरम्यान या रस्त्यात मोठमोठे खड्डे पडले असून वाहन चालकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गोदावरी उजवा कालवा पूल ते झगडेफाटा, श्री मयुरेश्वर गणपती मंदिर या भागात जीव घेणे खड्डे आहेत.

या रस्त्याच्या कामासाठी वेळोवेळी जन आंदोलन



करण्यात आली. रस्त्यावर भाकरी भाजण्यात आल्या मात्र तरी देखील प्रशासनाला याची दया आली नाही. पंधरा कोटी रुपये निधी या रस्त्यासाठी मंजूर झाला होता त्यावेळी केलेले काम अक्षरशः उखडुन गेले. नव्याने दुरुस्तीसाठी दहा कोटी मिळाले असल्याचेही सांगण्यात आले. रस्त्याची दुरुस्तीही करण्यात आली मात्र मागील आठवड्यात पडलेल्या पावसाने पुन्हा या रस्त्याची वाट लागली.या रस्त्याच्या कामासंदर्भात आता दोष द्यायचा कोणाला असा प्रश्न सध्या पोहेगांव परिसरातील जनतेला पडला आहे.शिकारी खड्ड्यांची शिकार होण्यासाठीच परिसरातील जनतेने जन्म घेतला आहे का, अजून किती बळी गेल्यानंतर या रस्त्याचे काम पूर्ण होईल. प्रशासनानेही जनतेचा अंत न पाहता या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून सत्य परिस्थिती लक्षात घेऊन रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी सध्या होत आहे.

# गोदावरी विकास सोसायटीची १०० टक्के कर्जवसुली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : तालुक्यातील चासनळी येथील गोदावरी विकास सोसायटीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात बँक पातळीवर १०० टक्के कर्जवसुली करत सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण केला आहे. ही माहिती संस्थेचे संस्थापक तथा अध्यक्ष पंडितराव चांदगुडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. राज्य सरकारकडून कर्जमाफीची चर्चा सुरू असतानाही सभासद शेतकऱ्यांनी कर्जफेडीस प्राधान्य देत संस्थेच्या विश्वासार्हतेला बळकटी दिली. संस्थेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या १ कोटी ८७ लाख ४३ हजार ४२४ रुपयांच्या कर्जासह ११ लाख २९ हजार ३१३ रुपयांचे व्याज अदा करून ३० जून २०२६ अखेर संपूर्ण वसुली पूर्ण केली आहे. संस्थेमार्फत सभासदांना पीक कर्ज, मध्यम मुदत तसेच दीर्घ मुदतीची कर्जे नियमितपणे उपलब्ध करून दिली जात असल्याचेही चांदगुडे यांनी सांगितले. या यशामध्ये संचालक मंडळाचे सहकार्य तसेच तालुका विकास अधिकारी लोहकरे, बँक निरीक्षक औताडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभल्याचे त्यांनी नमूद केले. पंडितराव चांदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा विकास सातत्याने होत असून परिसरातील एक विश्वासार्ह सहकारी संस्था म्हणून गोदावरी विकास सोसायटीने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या यशाबद्दल सचिव डी. आर. निकम यांनी संचालक मंडळ, पदाधिकारी, कर्मचारी आणि सभासद शेतकऱ्यांचे आभार मानले.

# मातापित्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले नगरसेवक तथा स्वच्छता विभागाचे सभापती स्वप्निल राजेंद्र मापारी आणि ॲड. अनिकेत राजेंद्र मापारी यांच्या वतीने त्यांच्या स्वर्गीय मातापित्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ज्ञानोदय इंग्लिश स्कूल व सुंदरबाई गांधी कन्या विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. राजेंद्र मापारी व स्व. सीमाताई मापारी यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नेवासा मार्केट कमिटीचे सभापती नंदकुमार पाटील, नगरसेवक स्वप्निल मापारी, ॲड. अनिकेत मापारी, नगरसेवक संभाजी धोत्रे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना नंदकुमार पाटील यांनी मापारी बंधू आपल्या आई-वडिलांचा सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेत असून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचा त्यांचा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे सांगितले. विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापकांनी मापारी बंधूंचे आभार मानले.

या कार्यक्रमात युवा उद्योजक राहुल मुंडलिक यांनी विद्यालयाला २१ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. सूत्रसंचालन संजय आखाडे यांनी केले. यावेळी नगरसेवक स्वप्निल मापारी यांनी भविष्यातही गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी कायम खंबीरपणे उभे राहणार असल्याची ग्वाही दिली.

# बालाजी देवस्थानच्या अध्यक्षपदी मुंगसे तर उपाध्यक्षपदी चोपडा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील बालाजी देवस्थानच्या नवीन कार्यकारिणीची नुकतीच निवड देवस्थानच्या सभागृहामध्ये पार पडली. ही निवड हभप सुखदेव महाराज मुंगसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यामध्ये अध्यक्षपदी भाऊसाहेब रामकृष्ण मुंगसे यांची तर उपाध्यक्षपदी सुभाष चोपडा व सचिवपदी ज्ञानदेव गोरक्षनाथ कदम तर खजिनदारपदी संभाजी रामभाऊ काजळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

तर विश्वस्तपदी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, नवनाथ महाराज मुंगसे, चांगदेव तांबे, रामानंद मुंगसे, सुभाष मुंगसे, अशोक गांधी, अभय लुनिया, संदीप मुंगसे, संतोष कुटे, हर्षल गुगळे, दिनेश गुगळे, योगेश चेडे, छाया खंडेश्वर कोकरे, बबन देवा तांदळे, रत्नाकर तांदळे, मनोहर तांदळे, नंदकुमार तांदळे यांची निवड करण्यात आली असून नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. देवस्थानच्या विकासासाठी तसेच विविध






धार्मिक व सामाजिक उपक्रम अधिक जोमाने राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

तर याप्रसंगी शरद गरड, माजी सरपंच बाजीराव पाटील मुंगसे, माजी चेअरमन कडूभाऊ तांबे, माजी सभापती कारभारी चेडे, माजी अध्यक्ष कुंडलिक दादा कदम, माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय चेडे, माजी सरपंच रामेश्वर गोयकर, चंद्रभान कदम, भाऊसाहेब सावंत, निलेश कोकरे, जनाभाऊ तांबे, शिवाजी मुंगसे, माजी चेरमन बाबासाहेब मुंगसे, सरपंच चंद्रकांत मुंगसे, अशोक तांबे, उद्धव मुंगसे, माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे, माजी चेरमन खंडेश्वर कोकरे, मच्छिंद्र कोकरे व नागरिक, भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष भाऊसाहेब मुंगसे आणि उपाध्यक्ष सुभाष चोपडा यांनी सर्वांचे आभार मानून देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचे आश्वासन दिले. नवनिर्वाचित अध्यक्ष व विश्वस्तांचे तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

# नगराध्यक्षांचे आरोप बिनबुडाचे; विकासाला नव्हे तर नियमबाह्य कारभाराला विरोध : उपनगराध्यक्षा शालिनीताई सुखदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नगरपंचायतीच्या नगराध्यक्षांनी आमच्या गटातील नगरसेवकांवर केलेले विकासविरोधी आरोप बिनबुडाचे व जनतेची दिशाभूल करणारे असल्याचा आरोप उपनगराध्यक्षा शालिनीताई सुखदान यांनी केला आहे. प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या गटाचा विकासकामांना विरोध नसून अपूर्ण माहिती, आवश्यक प्रशासकीय टिपण्या आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता सभेपुढे मांडण्यात आलेल्या विषयांना विरोध आहे.

सुखदान यांनी सांगितले की, शहराच्या विकासासाठी सर्वपक्षीय सहकार्याच्या भूमिकेतून त्यांच्या गटाने नगराध्यक्षांच्या गटाला विकासनिधीचे ५० टक्के वाटप करण्यास सहमती दर्शविली होती. मात्र, ३ जुलैच्या सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यात त्यांच्या गटाने सुचविलेल्या विकासकामांचा समावेश करण्यात आला नव्हता. तसेच निधी, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी आणि इतर आवश्यक कागदपत्रांचाही अभाव असल्याने त्यांनी लेखी आक्षेप नोंदविल्याचे त्यांनी सांगितले.



२० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ड्रेनेज, रस्ते, पाणीपुरवठा, सोलर हायमास्ट यांसारख्या विकासकामांना बहुमताने मंजुरी दिल्यानंतर तेच विषय पुन्हा 'अर्जंट' म्हणून सभेपुढे का आणले गेले, याचे उत्तर नगराध्यक्षांनी द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

सर्व नगरसेवकांना समान सन्मान, सर्व प्रभागांना न्याय्य निधी, पारदर्शक कार्यपद्धती आणि कायद्यानुसार संपूर्ण माहिती असलेला अजेंडा दिल्यास शहराच्या विकासातील प्रत्येक ठरावाला आमचा पाठिंबा राहील, असेही सुखदान यांनी स्पष्ट केले.

> २०१७ मध्ये नगराध्यक्षपदी भाजपच्या संगीताताई बर्डे तर नगरपंचायतीत बहुमत क्रांतिकारी शेतकरी पक्षाचे होते. तरीही कोणताही भेदभाव न करता सर्व प्रभागांमध्ये विकासनिधीचे समान वाटप करून शहराचा विकास साधला. त्यांचा आदर्श विद्यमान नगराध्यक्षांनी घ्यावा, असे आवाहन उपनगराध्यक्षा शालिनीताई सुखदान यांनी केले.

# ब्राह्मणवाडे येथे बीबीएफ यंत्राद्वारे सोयाबीन पेरणीचा शुभारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : सिन्नर तालुक्यातील ब्राह्मणवाडे येथे विठ्ठल रुक्माई नैसर्गिक शेती शेतकरी गट, ब्राह्मणवाडे-जोगलटेंभी यांच्या वतीने खरीप हंगाम २०२६-२७ निमित्त सोयाबीन पीक व्यवस्थापन व उत्पादनवाढ विषयक शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या हस्ते बीबीएफ (ब्रॉड बेड फरो) यंत्राद्वारे सोयाबीन पेरणीचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमास इगतपुरी येथील कृषी संशोधन केंद्राचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अविनाश कोळगे तसेच पिंपळगाव बसवंत कांदा व द्राक्ष संशोधन केंद्राचे वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. राकेश सोनवणे प्रमुख उपस्थित होते. यावेळी डॉ. बोडके यांनी आधुनिक तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण आणि



शास्त्रशुद्ध शेती पद्धतींचा अवलंब करून कमी खर्चात अधिक उत्पादन कसे मिळविता येईल, याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. राकेश सोनवणे यांनी सोयाबीन पिकातील रोग व किडींचे व्यवस्थापन, बीजप्रक्रिया, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर, हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर घ्यावयाची काळजी आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक तांत्रिक बाबींवर सविस्तर माहिती दिली. यावेळी शेतकऱ्यांना ट्रायकोडर्मा, मेटारायझियम, सूक्ष्म अन्नद्रव्ये तसेच विविध प्रकारचे कीटक सापळ्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान डॉ. प्रशांत बोडके यांनी स्वतः ट्रॅक्टर चालवत बीबीएफ यंत्राद्वारे सोयाबीन पेरणीचे प्रात्यक्षिक सादर केले. शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे तज्ज्ञांनी समाधानकारक निरसन करत खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन विठ्ठल रुक्माई नैसर्गिक शेती शेतकरी गट आणि सानप ग्रो इंजिनिअरिंग/फार्म यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गटाचे अध्यक्ष कमलाकर रामराजे, सरपंच विलास गिते, रामदास सानप, अमित धात्रक, भिका माळी यांच्यासह कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# श्रीरामपूर ते चीन स्वप्नांचा, संघर्षाचा आणि तिरंग्याचा प्रवास

श्रीरामपूर कधी काळी श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा या छोट्याशा गावातील मातीच्या मैदानावर सुरू झालेला व्हॉलीबॉलचा प्रवास, एक दिवस भारताच्या तिरंग्यासह जागतिक स्पर्धेच्या मंचावर उभा राहील, याची कल्पनाही केली नव्हती. पण क्रीडा क्षेत्रात एक गोष्ट नेहमी खरी ठरते – मेहनत, सातत्य आणि प्रामाणिकपणा यांना एक दिवस नक्कीच यश मिळते.यंदा जागतिक अंडर-१८ शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय मुलांच्या संघाचा सहाय्यक प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. माझ्यासाठी हा केवळ एक प्रवास नव्हता, तर माझ्या आयुष्यातील सर्वात मोठ्या अभिमानाच्या क्षणांपैकी एक होता.या जागतिक स्पर्धेत भारतासह तुर्की, ग्रीस, चीन, ब्राझील, फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, नेदरलँड्स, चायनीज तैपेई, इस्रायल, बल्गेरिया, हाँगकाँग, सौदी अरेबिया, चिली, डेन्मार्क आणि इतर अनेक बलाढ्य देश सहभागी झाले होते. भारतीय संघात १४ मुलगे, १४ मुली तसेच प्रशिक्षक, व्यवस्थापक, पंच आणि फिजिओ अशा एकूण ३७ सदस्यांचा समावेश होता.या स्पर्धेपूर्वी ७ जून ते ३० जून दरम्यान झारखंडमधील ताना भगत इंडोर स्टेडियम, रांची येथे तब्बल २२ दिवसांचे राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात खेळाडूंच्या शारीरिक तंदुरुस्तीपासून तांत्रिक कौशल्य, मानसिक तयारी, संघभावना, शिस्त, सामन्यांतील रणनीती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाचे बारकावे यावर अत्यंत सखोल प्रशिक्षण देण्यात आले.



प्रत्येक दिवस नवी शिकवण देणारा होता आणि प्रत्येक खेळाडू स्वतःला अधिक सक्षम बनवत होता.भारतीय मुलांचा संघ अत्यंत कठीण गटात होता. साखळी फेरीत डेन्मार्क, ब्राझील आणि बल्गेरिया यांसारख्या बलाढ्य संघांवर सलग विजय मिळवत भारताने गटात अव्वल स्थान पटकावले आणि उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत तुर्कीसारख्या जागतिक दर्जाच्या संघाशी सामना झाला. आमच्या खेळाडूंनी अतिशय जिद्दीने आणि निर्भयपणे सामना खेळला. विजय हुकला, पण भारतीय संघाने आपल्या खेळाने सर्वांची मने जिंकली.त्यानंतर पाचव्या ते आठव्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यांमध्ये भारताने बेल्जियम आणि जर्मनी या मजबूत संघांचा पराभव करत जागतिक स्पर्धेत पाचवे स्थान पटकावले. ही केवळ क्रमांकाची बाब नव्हती; भारतीय शालेय व्हॉलीबॉलचा जागतिक स्तरावर वाढता दर्जा दाखवणारी ही ऐतिहासिक कामगिरी होती.स्पर्धे दरम्यान मला चीनला अगदी जवळून अनुभवण्याची संधी मिळाली. स्पर्धा ज्या शांगलुओ शहरात झाली, ते आकाराने छोटे असले तरी विकासाच्या बाबतीत अत्यंत प्रगत आहे. शहरात सर्वत्र विलक्षण स्वच्छता, शिस्त आणि नियोजन दिसत होते. दहा दिवसांच्या वास्तव्यात रस्त्यावर कचरा, घाण, डास किंवा माशा दिसल्या नाहीत. प्रत्येक गोष्ट अत्यंत व्यवस्थित आणि नागरिककेंद्रित वाटली.सर्वात जास्त प्रभाव पाडणारी गोष्ट म्हणजे शाळांमधील क्रीडा संस्कृती. जवळजवळ प्रत्येक शाळेत आधुनिक इंडोर व्हॉलीबॉल कोर्ट, उत्कृष्ट क्रीडा साहित्य, प्रशिक्षक आणि खेळाडूंसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध होत्या. विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच एखाद्या खेळात प्राविण्य मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. विशेष म्हणजे पालकही मुलांनी खेळात करिअर करावे यासाठी तितकेच उत्साही असतात. त्यामुळे शाळा सुटल्यानंतरही हजारो मुले मैदानावर सराव करताना दिसतात. स्पर्धेदरम्यान प्रत्येक देशाच्या संघाला चीनमधील एका शाळेला भेट देण्याची संधी देण्यात आली. त्या भेटीत सरकारी शाळांमधील सुविधा पाहून अक्षरशः आश्चर्य वाटले. आधुनिक वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वाचनालये आणि जागतिक दर्जाची क्रीडा संकुले पाहताना जाणवले की, चीनने क्रीडा क्षेत्रातील यशाची पायाभरणी शालेय स्तरावरच केली आहे.या प्रवासाने मला एक महत्त्वाचा धडा दिला. जागतिक स्तरावर यश मिळवण्यासाठी प्रतिभा पुरेशी नसते; त्यासाठी नियोजन, सुविधा, प्रशिक्षित मार्गदर्शन आणि क्रीडेला दिलेले प्राधान्य तितकेच आवश्यक असते. आज भारतातील अनेक शाळांमध्ये अद्याप दर्जेदार क्रीडा सुविधा नाहीत. अनेक विद्यार्थ्यांमध्ये क्षमता असूनही त्यांना योग्य मैदान, प्रशिक्षक किंवा संधी मिळत नाही. जर प्रत्येक शाळेत सुसज्ज क्रीडा संकुले उभी राहिली, विद्यार्थ्यांना नियमित खेळण्यासाठी वेळ दिला गेला आणि पालकांनीही शिक्षणाइतकेच क्रीडेलाही महत्त्व दिले, तर भारताला जागतिक स्पर्धांमध्ये अव्वल स्थान मिळवण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही.श्रीरामपूर ते चीन हा प्रवास माझ्यासाठी केवळ विमानाने केलेला प्रवास नव्हता. तो एका छोट्या गावातून सुरू झालेल्या स्वप्नांचा, हजारो तासांच्या मेहनतीचा, असंख्य विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा आणि भारताचा तिरंगा अभिमानाने जगासमोर फडकताना पाहण्याचा प्रवास होता.हा प्रवास संपला असला तरी एक नवे स्वप्न मनात रुजले आहेभारताला जागतिक व्हॉलीबॉलमध्ये अव्वल स्थानावर पाहण्याचे. आणि त्या स्वप्नासाठी माझे प्रयत्न यापुढेही अखंड सुरू राहतील.

**गौरव अरविंद डेंगळे**
**व्हॉलीबॉल प्रशिक्षक**

# सावळीविहीर सोसायटीच्या जिल्हा बँक प्रतिनिधीत्व रूपाली चव्हाण यांना बहाल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील सावळीविहीर खुर्द सोसायटीच्या वतीने देण्यात येणाऱ्या जिल्हा बँक प्रतिनिधी निवड प्रक्रीया पार पडली असून रुपालीताई विजय चव्हाण यांच्या नावाचा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला आहे .

सावळीविहीर खुर्द विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची जिल्हा बँक प्रतिनिधी निवड प्रक्रिया काल दि. १३ जुलै रोजी पार पडली. सदर प्रक्रिया ना. राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाले व आदरणीय डॉ. सुजय विखे यांच्या नेतृत्वात संपन्न झाली.

संस्थेचे अध्यक्ष मिलिंद तुकाराम जमधडे व उपाध्यक्ष सुनंदा वर्पे यांच्या नेतृत्वाखाली मीटिंग आयोजित करण्यात आली.

यावेळी रूपालीताई विजय चव्हाण यांच्या नावाची सुचना बाबासाहेब क्षीरसागर यांनी मांडली व भारत चव्हाण यांनी सुचनेस अनुमोदन दिले. त्यानंतर उपस्थित सर्व संचालकांनी एकमताने रूपाली चव्हाण यांना जिल्हा बँकेचा प्रतिनिधी म्हणून ठराव मंजूर केला.

सोसायटीचे सचिव संतोष वाघमारे सुभाष वर्पे, सोपान वर्पे, जनार्दन जांभुळकर, भाऊसाहेब दत्तात्रय वर्पे, बाळासाहेब भदे, उत्तमराव वर्पे, शिवाजी वर्पे, राजेंद्र उगले, अशोक सुराळे, भाऊसाहेब गणपत वर्पे, मधुकर कापसे, भारत सुराळे, सुधाकर वर्पे, अमोल प्रभाकर जमधडे, स्वम्निल चव्हाण, अमोल चव्हाण आदी उपस्थित होते.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### प्रवरेच्या कृषी कन्यांकडून पाथरे येथे ऊस उत्पादकांना हुमणीअळी नियंत्रणाचे धडे



**लोणी** : उस शेती फायदेशिर करण्यासाठी ऊस उत्पादकांनी उत्पादन तंत्रज्ञान समजून घेण्याची गरज आहे. आज वेगवेगळ्या रोग किडींचा प्रादुर्भाव वाढत आहे याचे नियंत्रण ऊस उत्पादकांनी वेळेत करण्याची गरज आहे. हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी जैविक आणि रासायनिक या दोन्ही घटकांचा वापर करताना एकत्रित आणि एकात्मिक पध्दतीने नियंत्रणावर शेतकऱ्यांनी भर द्यावा असे प्रतिपादन कृषी महाविद्यालयाचे प्रा.सुदाम वर्पे यांनी केले. ते पात्रे येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हुमणी अळीचे प्रशिक्षण देत असताना बोलत होते. या चर्चासत्रात प्रा. सुदाम वर्पे यांनी ऊस पिकावरील हुमणी अळीचे नियंत्रण करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी प्राचार्य प्रा. अमोल खडके, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप व प्रा. अक्षया वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली पाथरे येथे कार्यरत असणाऱ्या कृषिकन्या अपेक्षा मैंद, वैजयंता पवार, प्रतिक्षा मुंतोडे, कांचन औटी, दिक्षा भोये आदींनी प्रयत्न केले. चर्चासत्राचे प्रास्ताविक डॉ. रमेश जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थी प्रतिनिधी अपेक्षा मैंद हिने केले.

### वांजोळीत श्री ज्ञानेश्वरी पालखी दिंडीचे चार जेसीबींमधून जंगी स्वागत

**शनिशिंगणापूर** : श्रीक्षेत्र नेवासा येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या आषाढी



पायी पालखी दिंडी सोहळ्याचे वांजोळी येथे चार जेसीबींमधून पुष्पवृष्टी करून भव्य स्वागत करण्यात आले. माजी खासदार स्व. तुकाराम गडाख यांच्या पेट्रोल पंप परिसरात युवा नेते रविराज गडाख व जयश्रीताई गडाख यांच्या पुढाकाराने हा स्वागत सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. घोडेगाव, सोनई, नूतन वांजोळी, लोहोगाव, झापवाडी, खोसपुरी, आव्हारवाडी, गुजळे, शिगवे, मोरया चिंचोरे, पाणसवाडी आदी परिसरातील भाविकांनी पालखी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. आदर्श विद्यामंदिर माध्यमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी ढोल-ताशे, सनई, लेझीम आणि आकर्षक रांगोळीच्या माध्यमातून स्वागत केले. यावेळी जयश्रीताई गडाख यांनी वारकऱ्यांसमवेत फुगडी खेळत उत्साहात सहभाग नोंदविला. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी पालखीचे दर्शन घेऊन माऊलींच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.

### उद्या शेळीपालन व्यवस्थापनावर दोन दिवसीय व्यावसायिक प्रशिक्षण

**लोणी** : ग्रामीण युवक-युवतींना कृषी उद्योजकतेच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने पायरेन्सच्या कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे बुधवारपासून (दि. १५-१६जुलै) 'शेळीपालन व्यवस्थापन' या विषयावरील दोन दिवसीय व्यावसायिक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी दिली. 'कृषी उद्योजकता अभियान' अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रशिक्षणामध्ये शेळ्यांच्या विविध जाती, चारा व्यवस्थापन, संगोपन, रोग व आजार नियंत्रण, लसीकरण, प्रकल्प अहवाल तयार करण्याची पद्धत, विपणन व्यवस्थापन, शेड उभारणी, बँक कर्ज व विविध शासकीय योजनांची माहिती यासह अनेक विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्यक्ष प्रात्यक्षिके आणि प्रक्षेत्र भेटीद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना व्यावहारिक अनुभवही दिला जाणार आहे.

### कोपरगाव सकल दिगंबर जैन समाजाच्या पंचपदी राकेश काले, पाटणी बिनविरोध





**कोपरगाव** : कोपरगाव सकल दिगंबर जैन समाजाच्या वर्ष २०२६ ते २०२८ या कार्यकाळासाठी पंचपदी राकेश राजकुमार काले आणि रवींद्र (मुन्ना) मिठ्ठूलाल पाटणी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. समाजाची बैठक ११ जुलै रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीस समाजाचे विश्वस्त, माजी पंच तसेच मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. निवड प्रक्रियेनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. राकेश काले हे सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये सक्रिय असून ते रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष म्हणूनही कार्यरत राहिले आहेत. त्यांच्या अनुभवाचा समाजाच्या विकासासाठी निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच रवींद्र पाटणी यांच्या निवडीचेही समाजबांधवांनी स्वागत केले.

शिक्षणमहर्षी साहेबराव घाडगेपाटील यांच्या जयंतीनिमित्त

# त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात दोनशे मुलींची आरोग्य तपासणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षणमहर्षी साहेबराव घाडगेपाटील यांच्या ७३ व्या जयंतीनिमित्त त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात तैलचित्र व मुलींच्या आरोग्य संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरात सुमारे दोनशे मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली.या शिबिराचे उदघाटन नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात मुलींसाठी सर्वसाधारण आरोग्य तपासणी,रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन तसेच रक्तगट तपासणी करण्यात आली.

याशिवाय तज्ज्ञ डॉक्टरांनी मुलींना आरोग्यदायी जीवनशैली, संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि वेळोवेळी आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी झालेल्या शिबिर उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्रिमूर्ती पावन उपाध्यक्षा ड.स्नेहलताई घाडगे-चव्हाण पाटील हया होत्या. त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड.सुमतीताई घाडगे पाटील,डॉ. भागवत दहिफळे,अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेजच्या डॉ.शैलजा भदगले,डॉ.शीतल बर्डे,डॉ. चंद्रशेखर रौंदळ, डॉ.चेतना कानडे,डॉ. सारिका गोरे,डॉ. सागर डोखे,त्रिमूर्ती सिनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे, सिनियर कॉलेजच्या समन्वयक डॉ.अनुराधा गोरे, प्राचार्य सोपनराव काळे,संजयसिंग चौहान,डॉ. धनंजय आरसुळे,प्रा.जोसेफ, डॉ.संध्या भंगाळे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी आरोग्य चिकित्सा शिबिराचे उदघाटक नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले म्हणाले की निरोगी विद्यार्थी हेच सशक्त समाज आणि राष्ट्राची खरी ताकद असून शिक्षणासोबत आरोग्याची जपवणूक करणे ही काळाची गरज असून अशा उपक्रमांमुळे मुलींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होईल असा विश्वास बोलतांना व्यक्त केला.

पंचायत समिती आरोग्य विभागाचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भागवत दहिफळे आरोग्य अधिकारी यांनी मुलींना मार्गदर्शन करताना मिठाईचे प्रमाण



छाया-सुधीर चव्हाण नेवासा

कमी ठेवा, संतुलित आहार, मानसिक आरोग्य, तणावमुक्ती तसेच निरोगी मुलगी म्हणजे निरोगी कुटुंब तसेच सुदृढ समाजाचा पाया असा संदेश त्यांनी दिला. डॉ. शैलजा भदगले यांनी मुलींना नियमित व्यायाम, योग व पौष्टिक आहार याचा दैनंदिन जीवनात वापर कसा करावा याबाबत माहिती दिली. यावेळी नितीन जगताप,प्रा.विकास साळवे,प्रा. कृष्णा डमाळे,प्रा.निकिता बर्गे,प्रा. संतोष जावळे,प्रा.अनिकेत आरसुळे,प्रा. साईनाथ भवर,प्रा.योगिता गायकवाड, प्रा. खेडकर, प्रा.अश्विनी औटी,प्रा. गायत्री ढाकीफळे, प्रा. पल्हारे,प्रा. देवतरसे, प्रा.प्रविण आवारे,प्रा.ताराचंद विधाटे, प्रा.अभिजित रोडे,प्रा.गांगुर्डे,प्रा. जयश्री भवर, प्रा.गोरख गुंड, प्रा.सागर सोलट, प्रा.शेरे, प्रा.वैरागर, प्रा.पालवे, प्रा. गिरी,प्रा.शुभांगी भागवत,प्रा. नूतन वंजारे, प्रा.रीमा कराडे, प्रा.राव, प्रा.भाग्यश्री कोल्हे,प्रा.भदगले, प्रा.सारिका नांगरे तसेच विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आरोग्य शिबिराचे आयोजन त्रिमूर्ती सिनिअर कॉलेज, फार्मसी कॉलेज, मुलींचे बी.एड. कॉलेज आणि मुलांचे बी.एड. कॉलेज, त्रिमूर्तीनगर, नेवासा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या उपक्रमासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, पंचायत समिती नेवासा तसेच अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज, देवगड फाटा यांचे विशेष सहकार्य लाभले.

शिबिरामध्ये मोठ्या संख्येने मुलीनी सहभाग नोंदवून मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. मुलींच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि निरोगी मुली घडविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. आरोग्याची काळजी, प्रगतीची गुरुकिल्ली! या संदेशाला साजेसा हा उपक्रम ठरला असून, शिक्षणमहर्षी साहेबराव घाडगेपाटील यांच्या शिक्षण आणि समाज सेवेच्या विचारांना अभिवादन करणारा तसेच मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करणारा हा उपक्रम ठरला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मनिषा घावटे व प्रा. कोमल केने यांनी केले तर डॉ.संध्या भंगाळे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## कृत्रिम खतटंचाई निर्माण करणाऱ्यांना दणका

### जादा दराने विक्रीवर कारवाई : आ. खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर / झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर युरिया खताचा पुरेसा व वेळेवर पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने आवश्यक नियोजन केले असून तालुक्यासाठी सुमारे ७५० मेट्रिक टन युरिया उपलब्ध करण्यात आला आहे.

त्यापैकी ३५० मेट्रिक टन युरिया तातडीने विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आला असून जर खताची कृत्रिम टंचाई व जादा दराने विक्री करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल अशा इशारा आमदार अमोल खताळ यांनी दिला. खरीप हंगामात युरिया खताची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध व्हावे, यासाठी आमदार अमोल खताळ यांच्या संपर्क कार्यालयात सोमवारी (दि. १३ जुलै) कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत तालुक्यातील युरिया खतसाठा, वितरण व्यवस्था, उपलब्धता तसेच पुढील नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे, पंचायत समिती कृषी अधिकारी उघडे यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आ. खताळ म्हणाले की, खरीप हंगामात कोणत्याही शेतकऱ्याला युरिया खतासाठी हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी प्रशासनाने प्रभावी नियोजन करावे. तसेच खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणे, साठेबाजी करणे किंवा जादा दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल.

अधिकृत दरानेच खताची विक्री होऊन वितरण प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखली जावी, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. युरिया खताचा पुरवठा नियमित राहण्यासाठी कृषी विभाग सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून असून आवश्यकतेनुसार पुढील साठाही उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता गरजेनुसारच खताची खरेदी करावी, असेही आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

## ग्रामीण डाक सेवकांनाही मिळणार सभासदत्व

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर पोस्टल डिव्हिजन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., श्रीरामपूरच्या ४०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ग्रामीण डाक सेवकांनाही संस्थेचे सभासदत्व देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय एकमताने मंजूर करण्यात आला. काळे पाटील लॉन्स येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये चेअरमन राजेंद्र विश्वास यांच्या अध्यक्षतेखाली सभा उत्साहात पार पडली. कार्यकारी संचालक राधाकिसन पवार यांनी वार्षिक अहवाल, आर्थिक पत्रके, अंदाजपत्रक आणि विविध विषय सभेपुढे सादर केले. सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. पोस्टल संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष यादव यांनी संस्थेच्या सभासदाभिमुख कार्यपद्धतीचे कौतुक करत संचालक मंडळाने खर्चात काटकसर करून कमी व्याजदरात पारदर्शक पद्धतीने कर्ज उपलब्ध करून दिल्यामुळे सभासदांचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे सांगितले. तसेच संस्थेकडून सातत्याने चांगल्या दराने लाभांश वाटप होत असल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. सभेत पोटनियम दुरुस्तीला मंजुरी देण्यात आली. सहकार विभागाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर कार्यक्षेत्रातील ग्रामीण डाक सेवकांना सभासदत्व मिळणार असून, कर्जवाटपासाठी पूर्वीप्रमाणे जामीनदार पद्धत पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती चेअरमन राजेंद्र विश्वास यांनी दिली. सभेदरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि सेवानिवृत्त सभासदांचा संतोष यादव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपाध्यक्ष मीरा जगधने, संचालक सागर आढाव, शिवाजी चाफे, रावसाहेब खरात, विजया शहाणे, व्यवस्थापक योगेश बोरूडे यांच्यासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन विजया शहाणे यांनी, तर आभार रावसाहेब खरात यांनी मानले.

## योजनेच्या लाभार्थ्यांनी ई-केवायसी करून घ्यावी : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना तसेच श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजने अंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थ्यांनी शासनाच्या निर्देशानुसार तातडीने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

शासनाने लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत ठेवणे, योजनांमध्ये पारदर्शकता आणणे तसेच पात्र लाभार्थ्यांना नियमित व विनाअडथळा योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य केली आहे. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांनी अद्याप ई-केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांनी कोणतीही दिरंगाई न करता ही प्रक्रिया त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे. ई-केवायसीसाठी लाभार्थ्यांनी आधार कार्ड, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक तसेच आवश्यक कागदपत्रांसह जवळच्या



सेतू सुविधा केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, तहसील कार्यालय किंवा संबंधित शासकीय कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध सुविधांचाही लाभ घ्यावा.

३० जुलै च्या आत ई-केवायसी न केल्यास लाभार्थ्यांचे अनुदान किंवा निवृत्तीवेतन वितरणात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, निराधार महिला, विधवा, दिव्यांग तसेच गरजू लाभार्थ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य द्यावे. कोणत्याही चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवता शासनाने दिलेल्या सूचनांनुसार ई-केवायसी पूर्ण करावी असे आमदार काळे यांनी नमूद केले. तसेच महसूल, समाजकल्याण व ग्रामविकास विभागातील अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आशा व अंगणवाडी सेविका यांनी आपल्या परिसरातील संजय गांधी निराधार अनुदान योजना तसेच श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेतांना भविष्यात कोणत्याही अडचणी येवू नटे यासाठी ई-केवायसी बाबत माहिती देऊन ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे अशा सूचना केल्या आहेत.

राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत नियमितपणे पोहोचणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी कोणतीही दिरंगाई न करता तातडीने ई-केवायसी करून घ्यावी आणि शासनाच्या योजनांचा लाभ अखंडितपणे सुरू ठेवावा असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

## सामाजिक भान निर्माण करणे काळाची गरज : डॉ. संदीप म्हस्के

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्ती कोणतीही पूर्वसूचना न देता उद्भवू शकते. अशा संकटांचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक भान जोपासून आपत्ती व्यवस्थापनाबाबत सजग राहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. संदीप म्हस्के यांनी केले. संगमनेर तालुक्यातील मालुंजे येथील नवोदय विद्यालयात नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा दलाच्या सत्राच्या प्रारंभी आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. आश्वी खुर्द येथील कर्मवीर भाऊराव पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक डॉ. म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी, सुरक्षिततेचे नियम आणि प्रथमोपचारासंदर्भातील मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी आर.एस.पी. अधिकारी अनिल मुन्तोडे यांनी नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा दलाच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी मुख्याध्यापक अशोक बाभुळके होते. विद्यालयाच्या वतीने डॉ. म्हस्के यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षक दत्तू थिटमे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुभाष मुन्तोडे व विजयकुमार खरात यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन तेजस्विनी नागरे हिने, तर आभार प्रदर्शन सृष्टी डोंगरे हिने केले. कार्यक्रमास संगीता रहाणे, सुभाष आंधळे, दिलीप बर्डे, श्रीकांत कुलकर्णी, संजयकुमार नागरे, सारिका आंधळे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहीरनामा

**महाराष्ट्र शासन महसूल विभाग**
**तहसिलदार, तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर यांचे कार्यालय ता. संगमनेर, जिल्हा - अहिल्यानगर**

क्र. कावि/जन्म नोंद/५५७/२०२६
दुरध्वनी क्रमांक :- (०२४२५) २२५३५३

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. जावेद शब्बीर शेख रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ३/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वतः नामे शेख जावीद शेख शब्बीर यांचा जन्म मौजे संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १८/८/१९८२ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसांचे आंत, सुटटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकत/तक्रार दाखल करावी. मुदतीनंतर त्या हरकतींचा/तक्रारीचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

संगमनेर, दिनांक २४/०६/२०२६

**स्वाक्षरी**
**तहसिलदार संगमनेर**

### जाहीर नोटीस

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, राहाता यांचे कार्यालय
क्र. कावि/दंडव्य/ई-२७९६६६६/२०२६
राहाता, दिनांक-२९/०६/२०२६

श्री. राजु गुलाबनबी शाह रा. ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर - **अर्जदार**

**विरूध्द**-१. जन्म मृत्यू नोंद निबंधक-ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर

अर्ज :- जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये

ज्या अर्थी अर्जदार हे नमुद पत्तावर राहत असुन अर्जदार श्री.राजु गुलाबनबी शाह रा. ममदापुर, ता. राहाता जि. अहिल्यानगर यांचा जन्म दिनांक २७/१०/१९९३ रोजी ममदापुर ता. राहाता जि, अहिल्यानगर येथे झालेला आहे. त्यांची जन्माची नोंद कोठेही झालेली नाही, अर्जदार यांना माहिती नसल्याने तसेच त्यांना जन्माची नोंद करणे विषयी कोणतीही माहिती नसल्याने जन्माची नोंद करावयाचे राहुन गेलेले आहे. अर्जदारांना सदर जन्माच्या दाखल्याची गरज असल्याने त्यांनी जन्म-मृत्यु नोंद निबंधक ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर येथे अर्जदार श्री.राजु गुलाबनबी शाह रा. ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर यांचे जन्माच्या दाखल्या संबंधाने चौकशी केली असता जन्माची नोंद आढळुन येत नसल्याबाबतचे जन्माची नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र जन्म-मृत्यु नोंद निबंधक ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर यांनी दिले व जन्माच्या दाखल्यासाठी मा. तहसिलदार यांचे कडुन योग्य तो आदेश आणण्यास सांगितले. त्या करीता सदरचा अर्ज केलेला आहे.

त्या अर्थी अर्जदार श्री. राजु गुलाबनबी शाह रा. ममदापूर ता. राहाता जि. अहिल्यानगर यांचे जन्म दिनांक २७/१०/१९९३ रोजी ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर येथे झाला असून जन्म तारखेबाबत कुणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी तहसिल कार्यालय राहाता येथे जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत सकाळी ११.०० वाजता लेखी हरकत व कागदपत्रांस हजर राहावे अन्यथा कुणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन अर्जदार श्री. राजु गुलाबनबी शाह रा. ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर यांचा जन्म दिनांक २७/१०/१९९३ रोजी ममदापुर ता. राहाता जि. अहिल्यानगर येवून जन्म तारखेचा जन्म दाखला देण्यात येईल, ही जाहीर नोटीस दिली असे. आज रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले असे.

स्थळ- राहाता

Digitally signed by
AMOL RAMAKANT MORE
Date: 11.07.2026


# पांडुरंगा पाऊस पडू दे.. शेतकरी सुखी होऊ दे : शालिनीताई विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : प्रतिनिधी संतांचे विचार जपण्याचे काम वारीच्या माध्यमातून होत असते. विखे परिवार नेहमीच वारकरी सांप्रदाया समवेत राहिला असून, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे यांच्यापासून सुरू झालेली ही परंपरा आजही पुढे घेवून जाण्याचे काम होत असल्याचे समाधान जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील यांनी व्यक्त केले. यंदाच्या आषाढी वारीच्या निमित्ताने पांडूरंगाच्या चरणी चांगला पाऊस पडू दे.. शेतकरी सुखी होऊ दे.. संकटे दूर कर.. अशीच प्रार्थना असल्याचे त्यांनी चिंचपूर येथील पालखी प्रस्थान सोहळ्याप्रसंगी केली.

अहील्यानगर जिल्ह्यातून जाणाऱ्या दिंडीसाठी पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने अतिशय उत्तम तयारी केली आहे. चरणसेवा या उपक्रमा अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध वैद्यकीय तज्ञांची पथके वारकऱ्यांची उत्तम सेवा करत असल्याबद्दल त्यांनी असल्याबद्दल त्यांनी प्रशासनासह वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांचे अभिनंदन केले. शिर्डी मतदार संघातील चिंचपूर येथील श्री संत सुरदास महाराज पायी दिंडी सोहळा पायी दिंडी सोहळ्याच्या प्रस्थान प्रसंगी सौ. विखे पाटील आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत झाले. यावेळी पद्मश्री विखे पाटील कारखान्याचे माजी



अध्यक्ष कैलासराव तांबे, प्रवरा बँकेचे संचालक गीताराम तांबे, दिंडी चालक शिवाजी महाराज गिरी,ह.भ.प.नामदेव महाराज तांबे, ह.भ.प. मगनानंदगिरी महाराज,लक्ष्मण तांबे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शुभेच्छा देतांना सौ विखे पाटील म्हणाल्या, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे वारीच्या माध्यमातून संतांची शिकवण दिली जाते आणि या माध्यमातून सक्षम पिढी उभी राहात असल्याचा अभिमान आहे.शिर्डी मतदारसंघातून आणि जिल्ह्यातून जाणाऱ्या पायी दिंडी सोहळ्यासाठी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील,भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि विखे पाटील परिवार हा नेहमीच त्यांच्या सेवेसाठी तत्पर असतो. वारीच्या माध्यमातून संतांचे विचार समाजाला एकत्र आणतात समाजकारणा बरोबरच वारकऱ्यांचे आशीर्वाद नेहमीच पाठीशी राहीले आहेत. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी देखील कायमच वारकऱ्यांसाठी काम केलं आहे आणि याच माध्यमातून अनेक धार्मिक स्थळी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी आश्रमाची स्थापना करून या भाविकांना, सेवा सुविधा देण्याचं काम होत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातून जाणाऱ्या दिंडीसाठी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने उत्तम तयारी केली आहे यामुळे भाविकांची उत्तम सोय होत आहेत याशिवाय यावर्षी शासनाच्या माध्यमातून चरण सेवा हा उपक्रम राबवण्यात येत असल्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

## पान १ वरुन

### सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाला राष्ट्रवादीतूनच आक्षेप

यांना ही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यात, २६ फेब्रुवारी २६ रोजी घेण्यात आलेली पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक ही अवैध असल्याचे म्हणत ती रद्द करून पुन्हा निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. याबाबत स्वतंत्र आणि नि:पक्षपाती असा निवडणूक अधिकारी नेमून त्यांच्या मार्फत निवडणूक घेण्यात यावी. तोपर्यत राष्ट्रीय अध्यक्ष आणि सुधारीत ऑफिस बेअररची यादी रद्द समजावी, असेही नोटीसमध्ये बजावण्यात आले.

### बेग टोळीच्या छत्राखाली गुन्हेगारीचा हैदोस

अवैध वाळू व्यवसाय आणि इतर बेकायदेशीर धंद्यांमुळे शहरातील तरुण पिढी उद्ध्वस्त होत असल्याचा दावा करत या टोळीच्या प्रमुखांसह सर्व संबंधितांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

ओगले यांनी आकाश दुबैया हत्या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त करत, या प्रकरणातील सर्व आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी श्रीरामपूरकरांची भावना असल्याचे सांगितले. दरम्यान, आंदोलनादरम्यान विविध मान्यवरांनीही वाढत्या गुन्हेगारीवर संताप व्यक्त करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर टीका केली. शहरात हत्या, हाफ मर्डर, महिलांवरील अत्याचार, ड्रग्स आणि अवैध व्यवसाय वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे वक्त्यांनी नमूद केले.माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी मात्र आंदोलनाचा उद्देश योग्य असला तरी सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरणारा बंद दीर्घकाळ सुरू ठेवणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले.

बंद मागे घेऊन अन्य लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू ठेवावे, अशी सूचनाही त्यांनी केली.आकाश दुबैया यांच्या हत्येनंतर संतप्त नातेवाईकांनी आणि नागरिकांनी मृतदेह तब्बल चार तास पोलीस ठाण्यात ठेवून निषेध नोंदविला होता. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असली तरी संपूर्ण टोळीवर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

### लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख महिला बाद!

सरकारने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुमारे आठ महिन्यांचा अवधी दिला होता. मात्र, मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न करू शकल्याने ५० ते ५५ लाख महिला यादीतून बाद झाल्या. योजनेच्या नियमापेक्षा जास्त वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या १२ लाख महिलांचे अर्ज फेटाळण्यात आले. तपासणीत १२ लाख महिला या प्राप्तीकर भरणाऱ्या असल्याचे आढळून आले, ज्यांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. ६५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या ४.५ लाखांहून अधिक महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. सुमारे ५ लाख महिला आधीच 'नमो शेतकरी योजने'चा लाभ घेत असल्याने त्यांना या योजनेतून वगळण्यात आले.

### ढाकणे सहकारी साखर कारखान्यावर आरसीसी कारवाई

प्रादेशिक सहसंचालक कार्यालयाने स्पष्ट केले आहे की, अनेक कारखान्यांनी एफआरपीपेक्षाही अधिक दराने ऊस उत्पादकांना पैसे दिले आहेत. तसेच, ऊसतोडणी व वाहतूक खर्चाची नियमित लेखापरीक्षणाद्वारे पडताळणी केली जात असून, शासनाच्या धोरणानुसार शेतकऱ्यांना जास्त भाव देणाऱ्या कारखान्याकडे ऊस देण्याचा अधिकार कायम असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# पहिल्याच पावसात नगर-मनमाड महामार्गाची दुरवस्था

## आ. तानपुरेंनी अधिकाऱ्यांना खडसावले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** अहिल्यानगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गाच्या नव्याने करण्यात आलेल्या रस्त्याची पहिल्याच पावसात मोठी दुरवस्था झाल्याने कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राहुरी शहरातील जोगेश्वरी आखाडा ते राहुरीदरम्यान रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी नगरपरिषदेच्या डॉ. दादासाहेब तनपुरे सभागृहात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छक्अख), गुणवत्ता तपासणी करणाऱ्या कन्सल्टंट संस्थेचे अधिकारी, मुख्य ठेकेदार भारत कन्स्ट्रक्शनचे प्रतिनिधी तसेच लोकप्रतिनिधी व व्यापारी संघटनांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली.




बैठकीत आमदार तनपुरे यांनी अधिकाऱ्यांना कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत जाब विचारत जबाबदारांवर कारवाईची मागणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी रस्त्याचा अंतिम 'बी.सी. लेयर' (बिट्युमिनस काँक्रीट) वेळेत न टाकल्यामुळे पहिल्याच पावसात खालच्या थराची मोठ्या प्रमाणात हानी झाल्याची कबुली दिली. या निष्काळजीपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा आमदारांनी दिला.

बैठकीत राहुरी शहर व फॅक्टरी परिसरातील सिमेंटच्या चौकोनी ड्रेनेज लाईनबाबत व्यापारी व नागरिकांनीही नाराजी व्यक्त केली. शहरातील वाहतुकीच्या अडचणी लक्षात घेऊन रस्ता अधिक रुंद करण्यासाठी संबंधित उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडे शिष्टमंडळासह पाठपुरावा करण्याचे आश्वासन आमदार तनपुरे यांनी दिले.

रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून संभाव्य अपघात टाळणे ही सध्याची प्राथमिकता असल्याचे सांगत आमदारांनी संबंधित यंत्रणेला युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पुढील आठवडाभरात एका बाजूचे सर्व लेयर पूर्ण करून रस्ता वाहतुकीयोग्य करण्याचे आश्वासन ठेकेदार व महामार्ग अधिकाऱ्यांनी दिले. पावसाळ्यात कामाच्या दर्जाशी तडजोड होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. या बैठकीला नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, गटनेते हर्षदादा तनपुरे, नगरसेवक, पत्रकार, व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाढत्या गुन्हेगारीवर आळा घाला

## आ. आशुतोष काळेंच्या पोलीस प्रशासनाला सूचना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहरात वाढत असलेली गुन्हेगारी, चेन स्नॅचिंगच्या घटना तसेच बंद घरफोडीच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर आमदार आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहर व ग्रामीण पोलीस निरीक्षकांची संयुक्त आढावा बैठक घेत कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. या बैठकीत आमदार आशुतोष काळे यांनी शहर व ग्रामीण भागातील गुन्हेगारीच्या घटनांचा सविस्तर आढावा घेतला. विशेषतः नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या चेन स्नॅचिंग, बंद घरफोडी, चोरी तसेच इतर गंभीर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस प्रशासनाने अधिक सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, बस स्थानक परिसर तसेच संवेदनशील भागांमध्ये नियमित पोलीस गस्त वाढविणे,



रात्रीच्या वेळी विशेष गस्त पथके तैनात करणे, संशयित व्यक्तींवर बारकाईने लक्ष ठेवणे, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून प्रभावी निगराणी ठेवणे आणि गुन्हेगारांविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करावी. गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबरोबरच, नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देण्याच्या सूचना दिल्या. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविणे, तसेच नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल अथवा व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले. कोपरगाव शहर व तालुक्यातील प्रत्येक नागरिकाला सुरक्षित वातावरण मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पोलीस प्रशासनाने अधिक दक्षता घेऊन गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करावे असे निर्देश आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी पोलीस प्रशासनाला दिले.

बैठकीत उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांनी शहर व ग्रामीण भागात सुरू असलेल्या गुन्हे प्रतिबंधक उपाययोजनांची माहिती दिली. आगामी काळात गस्त वाढविणे, तपासाची गती वाढविणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हे उघडकीस आणण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.या बैठकीस कोपरगाव शहर पोलीस निरीक्षक उद्धव डमाळे व ग्रामीण पोलीस पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड आदींसह पोलीस उपनिरीक्षक उपस्थित होते.

# श्रीरामपुरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांची धडक कारवाई

## विशेष पथकाची नियुक्ती!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर शहरात वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांविरुद्ध पोलीस प्रशासनाने आता कडक पावले उचलली आहेत. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राखण्यासाठी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून एका विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकामध्ये १ पोलीस अधिकारी आणि १० पोलीस अंमलदारांचा समावेश असून, हे पथक आता दररोज शहर परिसरात धडक कारवाई करणार आहे. या विशेष मोहिमेच्या पहिल्याच दिवशी पोलीस पथकाने शहरात



जोरदार मोहीम राबवली. दिवसभरात वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या तब्बल ३५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होता.विना नंबर प्लेट असलेल्या गाड्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या फॅन्सी नंबर प्लेट्स वाहनांच्या काचांना बेकायदेशीरपणे लावण्यात आलेली काळी फिल्म पोलिसांची ही धडक मोहीम यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.शहरातील नागरिकांनी व वाहनधारकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.कोणत्याही वाहनधारकाने फॅन्सी नंबर प्लेट किंवा विना नंबर प्लेटच्या गाड्या वापरू नयेत. वाहनांवर फक्त आरटीओ मंजूर नंबर प्लेट आणि आरटीओ मंजूर फिल्म्सचाच वापर करावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढे अधिक कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे पोलिसांनी सागितले.

# कुरेशी जमात ट्रस्टच्या पुढाकाराने मतदार विशेष पुनरावलोकन शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील कुरेशी जमात खाना येथे कुरेशी जमात ट्रस्टच्या पुढाकाराने मतदार यादी विशेष पुनरावलोकन (एसआयआर) शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १२ ते १५ जुलैदरम्यान आयोजित या चार दिवसीय शिबिरात मतदान केंद्र क्रमांक ८१ ते ९२ मधील मतदारांना एसआयआर फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या केंद्रांमध्ये प्रामुख्याने प्रभाग क्रमांक २, नेहरूनगर-गोदावरी रोड परिसर तसेच अहिल्यादेवी नगर परिसरातील मतदारांचा समावेश आहे.

या शिबिरासाठी प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ तसेच



तहसील कार्यालयाच्या निवडणूक शाखेचे विशेष सहकार्य लाभले आहे. संबंधित मतदान केंद्रांवरील बीएलओ मतदारांना मार्गदर्शन करून आवश्यक फॉर्म भरून घेत आहेत.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जलील कुरेशी, साजिद सर, मुख्तारभाई शहा, जोयफ जमादार, अकबर पठाण, रईसभाई जहागीरदार, शाहरूख कुरेशी, तन्वीर कुरेशी यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. ट्रस्टचे अध्यक्ष महेबूब कुरेशी, सचिव हारुन कुरेशी आणि पदाधिकारी आयोजनासाठी प्रयत्नशील आहेत.

दरम्यान, फातिमा कॉलनीतील मुसा मशीदमध्येही मतदान केंद्र क्रमांक ६८ ते ७१ साठी स्वतंत्र एसआयआर शिबिर घेण्यात आले. या ठिकाणी बीएलओंनी मतदारांना मार्गदर्शन करून अर्ज भरून घेतले. मतदारांना काही अडचण अथवा तक्रार असल्यास तहसील कार्यालयाच्या निवडणूक शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांनी केले आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME TOUSIF AHMED SHAIKH (NAME AS PER SCHOOL DOCUMENTS ) TO NEW NAME AS TAUSIF AHEMAD SHAH VIDE AADHAR NO. 5124 9731 5840

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME AHMED SIKANDAR SHAIKH TO NEW NAME AS AHEMAD SIKANDAR SHAH VIDE AADHAR NO. 8441 7717 7115

# पुणतांब्यात दूध संकलन केंद्र फोडून चोरी; बॅटरी, इन्व्हर्टर, कॅनसह ऐवज लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** पुणतांबा-चांगदेवनगर-जळगाव मार्गावरील आठरावाडी परिसरातील श्रीकृष्ण दूध संकलन केंद्र फोडून अज्ञात चोरट्यांनी बॅटरी, इन्व्हर्टर, दुधाचे कॅन, पशुखाद्याची पोती तसेच इतर साहित्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून शेतकरी व दूध उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

निमगाव खैरी येथील सचिन ज्ञानदेव जोजे हे गेल्या तीन वर्षांपासून हे दूध संकलन केंद्र चालवत आहेत. सकाळच्या दूध संकलनासाठी केंद्रावर आल्यानंतर चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ राहाता पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांपासून या दूध संकलन केंद्रात वारंवार चोरीच्या घटना घडत असल्याचे जोजे यांनी सांगितले. केंद्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले तरी त्यांचे चार्जिंग नसल्याने कोणतेही फुटेज उपलब्ध झाले नाही. परिसरात सध्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे. काही दिवसांपूर्वी पुणतांबा-शिर्डी मार्गावरील रेल्वे पुलाखाली वाहनचालकांना लुटणाऱ्या चोरट्यांना ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले होते. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात रात्रीची पोलीस गस्त वाढवून गुन्हेगारीला आळा घालावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## निधन वार्ता

### वत्सलाबाई धसाळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** तालुक्यातील तांदुळवाडी येथील रहिवासी वत्सलाबाई आनंदराव धसाळ (वय ८०वर्षे) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्या अत्यंत मनमिळाऊ व धार्मिक स्वभावाच्या होत्या. त्या शंकर धसाळ व रायभान धसाळ यांच्या मातोश्री, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष तथा पत्रकार विनीत धसाळ यांच्या आई तसेच पृथ्वीवीर ॲग्रो फार्मचे संचालक अमोल धसाळ यांच्या आजी होत.

### रायचंद बागमार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** अरणगाव (ता. नगर) येथील व्यावसायिक रायचंद कचरदास बागमार (वय ८५) यांचे संथारा व्रतात निधन झाले. त्यांची मुलगी दीपाली मंडलेचा यांनी त्यांना सागरी संथारा दिला होता. त्यात त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्यामागे दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वैदूवाडी (सावेडी) परिसरातील हसमुख सुपर मार्केटचे संचालक संतोष बागमार व अरणगाव येथील संगीता प्रोव्हीजनचे संचालक सचिन बागमार यांचे ते वडील होत.

# लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त राज्यस्तरीय मराठी वक्तृत्व स्पर्धा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचा अभिमान, प्रभावी वक्तृत्वकला, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्यासाठी पद्मभूषण श्री करमसीभाई सोमैया राज्यस्तरीय मराठी वक्तृत्व स्पर्धेचे सहावे पर्व गुरुवार, २३ जुलै २०२६ रोजी कोपरगाव येथे आयोजित करण्यात आले आहे.सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडियम स्कूल, कोपरगाव यांच्या वतीने या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, राज्यभरातील इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे. शाळेचे प्राचार्य मा. श्री. के. एल. वाकचौरे यांनी सांगितले की, मराठी वक्तृत्व स्पर्धा ही केवळ स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विचार मांडण्याची कला, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामाजिक भान विकसित करावे, या उद्देशाने लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदाचे पाचवे पर्व अधिक भव्य, व्यापक आणि दर्जेदार स्वरूपात पार पडणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेतील पारितोषिके पुढीलप्रमाणे आहेत : प्रथम क्रमांकासाठी ५,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी ३,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकासाठी २,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच पुढील सात उत्कृष्ट वक्त्यांना प्रत्येकी १,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. स्पर्धेतील प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# सावळीविहीर जंक्शनवरील वाहतूक कोंडी तीन दिवसांत दूर होणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी, :** नगर-मनमाड महामार्गावरील सावळीविहीर जंक्शन येथे रस्ते व उड्डाणपुलाच्या कामामुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी पुढील तीन दिवसांत मोठ्या प्रमाणात कमी केली जाईल. गुरुपौर्णिमेपूर्वी रस्त्याची एक बाजू पूर्ण करून वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार असल्याची माहिती भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली. सावळीविहीर येथे राष्ट्रीय महामार्गाचे व उड्डाणपुलाचे काम एकाच वेळी सुरू असल्याने वाहतुकीवर मोठा ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. विखे पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन, संबंधित ठेकेदार आणि परिसरातील ग्रामस्थांची संयुक्त बैठक घेऊन कृती आराखडा निश्चित केला.

बैठकीत अवजड वाहनांसाठी स्वतंत्र नियोजन, कामाचा वेग वाढविणे, वाहतुकीचे प्रभावी नियमन आणि तातडीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. गुरुपौर्णिमेपूर्वी उड्डाणपुलाच्या शेवटापासून बायपासच्या सुरुवातीपर्यंत रस्त्याची एक बाजू पूर्ण करून वाहतुकीसाठी खुली केली जाणार असून दुसरी बाजू मोटरेबल ठेवली जाणार आहे. धुळीच्या समस्येबाबत बोलताना त्यांनी घाईघाईने काम केल्यास भविष्यात रस्ता खचण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, असे सांगत दर्जेदार व टिकाऊ कामासाठी काही दिवस नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. रस्त्याच्या मध्यरेषेपासून १५ मीटर परिसरातील अतिक्रमणे दोन दिवसांत स्वेच्छेने हटवावीत, अन्यथा पोलीस प्रशासनाच्या मदतीने कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. दूध भेसळविरोधी कारवाईवर प्रतिक्रिया देताना डॉ. विखे पाटील यांनी भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईला पाठिंबा दर्शविला. मात्र, कारवाईपूर्वी सखोल पडताळणी करून प्रामाणिक दूध उत्पादकांवर अन्याय होणार नाही, याची प्रशासनाने काळजी घ्यावी. तसेच कारवाई निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## श्रीरामपूरातील गुन्ह्यांच्या निषेधार्थ आज टाकळीभान बंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूरमध्ये घडत असलेल्या वारंवार गुन्ह्यांच्या घटनेच्या निषेधार्थ आज मंगळवार दि.१४ जुलै रोजी टाकळीभान बंदचे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याच्या घटनांना आळा बसावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली असून व्यापारी बांधवांनी स्वयं स्फूर्तीने बंद पाळावा असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

# गुरु शिष्य बंधू पुन्हा भेटले !

## पादुकांच्या माध्यमातून संतबंधूंचा मिलन सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अहिल्यानगरच्या भूमीवर रविवार १२ जुलै रोजी इतिहास नव्याने लिहिला गेला. संतपरंपरेतील दोन तेजस्वी अध्याय, दोन संतबंधू आणि दोन पालख्या आणि पादुका एका ठिकाणी एकत्र आल्या आणि अवघा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

खरंतर प्रथम नाशिक येथील संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखीचे अहिल्यानगरमध्ये आगमन झाले. त्यापाठोपाठ ज्ञानेश्वरी रूपात श्रीक्षेत्र नेवासा येथून प्रस्थान केलेल्या संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पालखीचे देखील नगरमध्ये आगमन झाले.

ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पालखी सोहळा अहिल्यानगर शहरात दाखल झाल्यानंतर नगर प्रदक्षिणा दरम्यान प्रशासनाच्या वतीने आणि आ. संग्राम जगताप



यांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. संपूर्ण अहिल्यानगर शहरात तोफांची सलामी देत फटाके वाजवून पालखीचे स्वागत करण्यात आले.

यावेळी संत निवृत्तीनाथ महाराज संस्थान पालखी सोहळा त्रिंबकेश्वर यांच्या वतीने ज्ञानेश्वर मंदिर संस्थांचे ह.भ.प.देविदास महाराज म्हस्के, ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पालखी सोहळा कमिटीचे अध्यक्ष ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर, ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के, अहिल्यानगर शहराचे आ.संग्राम भैया जगताप यांचा श्रीफळ व निवृत्तीनाथ महाराजांची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. या भेटी प्रसंगी ज्ञानेश्वर मंदिराचे विश्वस्त कृष्णा पिसोटे, कैलास जाधव, आप्पासाहेब होन, चोपदार आरगडे महाराज, योगेश रासने अनिल शिंदे, जालिंदर गवळी, शंकर नाबदे, आशिष कावरे, अक्षय टेकाळे, अहिल्यानगर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

दोन्ही पालख्यांच्या आगमनानंतर पाहायला मिळाला दोन्ही भावांच्या भेटीचा अनोखा संगम. संत ज्ञानेश्वर माऊली यांनी नेवासेत ''ज्ञानेश्वरी'' ग्रंथरचना केली. त्यांच्या कर्मभूमीवरून सुरू झालेल्या या पालखी सोहळ्यात भक्तांमध्ये वेगळाच उत्साह दिसून आला. आज त्याच नगरीत, त्यांचे ज्येष्ठ बंधू आणि गुरु निवृत्तीनाथ महाराज यांच्या पालखीशी झाली ही विलक्षण भेट. जणू साक्षात दोन्ही संत एकत्र आले आहेत, अशी अनुभूती हजारो भाविकांनी घेतली.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

मंगळवार दि .१४ जुलैं २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१२० ३४६ ३३७ | ३-९ | १३० २७० १२५
जोड ३२-६९-१५-०४-९८

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१२९ ४८० ६६० | २-७ | १२४ ४६७ ३४०
जोड २६-०७-८१-९५-७६

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१२६ ४५० १४४ | ९-२ | १५६ २४६ २२८
जोड ९०-५२-१६-३७-२८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | | | | |

# खा. वाकचौरेंनी घेतला आंदोलनाचा धसका?

## आंदोलनापूर्वीच ठाकरे गटाचे शिवसैनिक पोलिसांच्या ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर : ठाकरे गटातून फुटून शिंदे गटात सहभागी झालेल्या शिवसेनेचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांना काळे फासण्याचा इशारा ठाकरे गटाने दिल्यानंतर सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. आंदोलनाची शक्यता लक्षात घेऊन तोफखाना पोलिसांनी आंदोलनापूर्वीच ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांच्यासह दहा कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.**



या घडामोडींमुळे खा. वाकचौरे नियोजित वेळेपेक्षा तब्बल साडेतीन तास उशिराने दिशा समितीच्या बैठकीस पोहोचले.

दिशा (जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती) बैठकीची वेळ दुपारी १२.३० वाजता होती. मात्र, वाकचौरे यांच्या विरोधातील आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्यांना परिस्थितीची कल्पना दिली. दरम्यान, गिरीश जाधव, साजिद सय्यद, बशिद तांबटकर, अशोक पारधे, योगेश जाधव, राम साळवे, किरण पाडळे, अमोल पाडळे, गणेश कांबळे आणि अक्षय साळवे यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात हलविले. आंदोलकांना ताब्यात घेतल्याची खात्री झाल्यानंतरच खा. वाकचौरे सायंकाळी चारच्या सुमारास कडेकोट पोलिस बंदोबस्तात जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. बैठकीस सहअध्यक्ष खा. नीलेश लंके आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठक सायंकाळी साडेसहाच्या सुमारास संपल्यानंतर वाकचौरे रवाना झाले. त्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची सुटका केली. दरम्यान, वाकचौरे पुन्हा नगरमध्ये आल्यानंतर काळे फासण्याचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा गिरीश जाधव यांनी दिला आहे.

# द • ख • ल

## आनंदो शाळा सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण




**करंजी :** समाजातील वंचित, गरजू आणि दुर्लक्षित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कार्यरत असलेल्या लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आनंदो शाळा सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील मेहेकरी तसेच पाथर्डी तालुक्यातील निंबोडी, वैजूबाभुळगाव, निवडूंगे, पाडळी आणि मोहोज येथील शाळांमध्ये इयत्ता ८ वी ते १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या ८३९ गरजू, गरीब, अनाथ, एकल पालकत्व असलेल्या व दुर्लक्षित विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. स्थापन समितीचे अध्यक्ष, मुख्याध्यापक आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा लाभ घेऊन शिक्षणात प्रगती करावी, असे आवाहन केले. यावेळी कुशल बापसे, शिवाजी चव्हाण, कृष्णा आखमोडे, रेणुका पालवे, महेश पालवे, रेशमा शिदोरे, पूजा शिदोरे, मनीषा गोरे, वैशाली टाके, ऋषिकेश साखरे, मच्छिंद्र वाबळे आणि वैभव थोरात यांच्यासह लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे कर्मचारी, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## दारूच्या नशेत दोघांकडून कंपनीतील इंजिनीयरला मारहाण

**अहिल्यानगर :** कायनेटिक कंपनीत एका ट्रेनी इंजिनिअरला दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून कंपनीच्याच माजी कर्मचाऱ्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली. ही घटना १२ जुलै रोजी दुपारी घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुफीयांन अल्लाबक्ष इनामदार (रा. नोबेल हॉस्पिटल जवळ, प्रेमदान चौक, अहिल्यानगर ) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, सुफीयांन हे कायनेटिक कंपनीत ट्रेनिंग इंजिनियर म्हणून कार्यरत आहेत. तर आरोपी राहुल खंडागळे व यश सोनवणे (दोघे रा. कायनेटिक चौक,अहिल्यानगर) हे देखील याच कंपनीत काम करत होते. मात्र त्यांनी जून २०२६ मध्ये काम सोडले होते. १२ जुलै रोजी दुपारी ३.३५ वाजण्याच्या सुमारास दोघेजण दारूच्या नशेत आपला जुना पगार घेण्यासाठी कंपनीत आले. तेथे त्यांची ओळख असलेल्या सुफीयांन यांच्याकडे आरोपींनी दारू पिण्यासाठी २०० रुपयांची मागणी केली. मात्र सुफियान यांनी आपल्याकडे पैसे नसल्याचे सांगितले. याचा राग मनात धरून दोघांनी सुफियान यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच तू आम्हाला पैसे दिले नाही तुझ्याकडे पाहून घेतो, अशी धमकी देत शिवीगाळ व दमदाटी केली. याबाबत सुफियान यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून राहुल खंडागळे व यश सोनवणे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे हे करत आहेत.

## दुचाकीस्वाराला वाचविण्याच्या प्रयत्नात टेम्पो चालकाचा मृत्यू

**अहिल्यानगर :** राँग साईडने भरधाव वेगात आलेल्या दुचाकी स्वराला वाचवण्याच्या प्रयत्नात टेम्पो नवीन उड्डाणपुलच्या कॉलमला जाऊन धडकल्याने चालकाचा मृत्यू झाल्याची घटना एमआयडीसी सन फार्मा चौकात घडली. इरफान अन्वर शेख (रा. करडे, ता. शिरूर, जि. पुणे) असे मयत टेम्पो चालकाचे नाव आहे. याबाबत त्यांचा मुलगा शोएब शेख यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, मयत इरफान शेख हे दिनांक ११ जुलै रोजी पहाटे त्यांच्या टेम्पो घेऊन एमआयडीसीकडे जात असताना सन फार्मा चौकात अचानक एका दुचाकी स्वराने त्याच्या ताब्यातील दुचाकी वेगात चालवून समोरून येत असताना त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात टेम्पो चालकाने आपले वाहन बाजूला घेण्याचा प्रयत्न केला मात्र दुर्दैवाने ताबा सुटल्यामुळे हा टेम्पो रस्त्या शेजारी असलेल्या नवीन पुलाच्या कॉलमला जाऊन जोरात धडकला. या अपघातात टेम्पो चालकाला गंभीर दुखापत झाली आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. याबाबत पोलिसांनी अज्ञात दुचाकी स्वराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



## सावेडीत सावळी तांडा दिंडीचे स्वागत

**अहिल्यानगर :** आषाढी वारीनिमित्त धुळे जिल्ह्यातील सावळी तांडा येथील वारकरी पायी दिंडी सोहळ्याचे सावेडी गावात मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या निवासस्थानी उत्साहात स्वागत करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजरात तसेच ज्ञानोबा-तुकाराम आणि पांडुरंग यांच्या जयघोषांनी संपूर्ण सावेडी गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. यावेळी वारकऱ्यांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. ह.भ.प. राजाराम महाराज पवार यांनी सांगितले की, वाकळे कुटुंबीयांकडून आजोबांच्या काळापासून वारकऱ्यांचे आदरातिथ्य होत आहे. कुमारसिंह वाकळे यांनीही हा वारसा जपला असून वारकरी पांडुरंगाकडे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी, चांगला पाऊस पडावा व भरघोस पीक यावे यासाठी प्रार्थना करीत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी ह.भ.प. राजाराम महाराज पवार, बबनराव वाकळे, नवनाथ कोलते, दशरथ वाकळे, गंगाधर वाकळे, सुभाष वाकळे, पंकज वाकळे, रमेश पुंड, आबासाहेब कातोरे, रावसाहेब वाटमोडे, राहुल गाडेकर, संभाजी कराळे, गौरव परदेशी, बाबा भोर, प्रशांत बेलेकर, श्रीकांत दंडवते, पवन वाकळे, प्रवीण अकोलकर, महेश महापुरे, शिवाजी कळमकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## हरित उद्याचा संकल्प पर्यावरण संवर्धन उपक्रम उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर :** आनंद धाम रोड येथील राष्ट्रीय शिक्षण मंडळ संचलित एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी, अहिल्यानगर येथे कै. कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आबासाहेब काकडे संस्था मध्ये हरित उद्याचा संकल्प या पर्यावरणपूरक उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि शाश्वत विकासाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत रोपदान केंद्र, वृक्षारोपण, तसेच वृक्षांच्या संगोपनासाठी वृक्ष वाढ दिनदर्शिका या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या ग्रोथ डायरीच्या माध्यमातून लावलेल्या प्रत्येक वृक्षाच्या वाढीची नियमित नोंद ठेवून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. कै. कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या समाजाभिमुख, पर्यावरणपूरक व विकासाभिमुख विचारांना अभिवादन करत संस्थेने हरित उद्याचा संकल्प या उपक्रमातून हरित भविष्याचा दृढ संकल्प व्यक्त केला.

## स्व. आ. राजीव राजळे यांची समाजसेवेची परंपरा सुरू ठेवणार : आ. मोनिकाताई राजळे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**शेवगाव :** आदी फौंडेशन, आदिनाथनगर यांच्यावतीने शेवगाव तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, एमपीएससी, यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करून विविध अधिकारी पदांवर निवड झालेल्या अधिकाऱ्यांचा तसेच शेवगाव तालुक्यात शिक्षक पदावरून केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती झालेल्या नवनियुक्त केंद्रप्रमुखांचा गुणगौरव व सत्कार सोहळा शुभम मंगल कार्यालय, शेवगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

यावेळी बापूसाहेब भोसले, नगरसेविका आशाताई बुलबुले, सविता फडके, डॉ. गीता लांडे, नगरसेवक गणेश कोरडे, सागर फडके, विनोद मोहिते, कमलेश गांधी, विद्याताई आधाट, मीनाताई कळकुंबे, दिपाली काथवटे, उमेश भालसिंग, भीमराज सागडे, सतीशराव लांडे, कैलास सोनवणे, अजय भारस्कर, राहुल सावंत, अशोकराव खिळे, नारायण मडके, कासम शेख, अशोकराव ससाने, अशोकराव तानवडे, वाय. डी. कोल्हे, गंगाभाऊ खेडकर, केशव आंधळे, संजय खेडकर, सुनीलसिंग राजपूत, राजेंद्र डमाळे, सुरेश नेमाने, सुधीर जायभाय, अनिल सुपेकर, चंद्रशेखर मुरदरे, सोमनाथ कळमकर, बाबासाहेब गोरडे, अनंता उकिरडे, ज्ञानेश्वर खांबट, लहू भवार, सचिन म्हस्के, सुभाषराव बडदे, महादेव पवार, सुभाषराव बरबडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## क्षत्रिय कुमावत समाजसेवा संघातर्फे श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज पायी दिंडीचे स्वागत



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** क्षत्रिय कुमावत समाजसेवा संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने परमपूज्य ह.भ.प. गुरुवर्य महामंडलेश्वर १००८ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पावन उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला भव्य दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात, उत्साहात आणि मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. या सोहळ्यास हजारो वारकरी, भाविक, सेवेकरी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शविली व कार्यक्रमाची शोभा वाढविली. यावेळी चंद्रशेखर, लामखनेजी, विकास जाधव, संपत शिंदे तसेच इतर मान्यवर लष्करी अधिकाऱ्यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. दिंडी सोहळ्याचे प्रभावी व ओघवते सूत्रसंचालन कु. अश्विनी अरुण छल्लारे यांनी केले. यावेळी महाप्रसाद सेवेची जबाबदारी अवधूत कुकडवाल, सागर कुकडवाल, प्रतीक कुकडवाल, संजय कुकडवाल, प्रवीण परदेशी, पुरुषोत्तम छल्लारे, महेश छल्लारे, प्रा. डॉ. अमरनाथ कुमावत, मुकुंद परदेशी, कडुबाळ परदेशी, श्रीकांत नाईक, नितीन बेलदार, राजेंद्र राजवाळ, श्री कामे, दिपक परदेशी,महादेव घाटेवाळ पत्रकार राजेंद्र परदेशी तसेच समाजातील अनेक सेवाभावी कार्यकर्त्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## संत निळोबाराय पायीदिंडी पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि ब वर्ग तीर्थक्षेत्र असलेल्या श्रीक्षेत्र पिंपळनेर येथील श्री संत निळोबाराय महाराजांच्या पायी दिंडी पालखी सोहळ्याचे दुपारी ३ वाजता संजीवन समाधी मंदिरातून पंढरपूरच्या दिशेने भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले.

सकाळी निळोबाराय महाराजांच्या राहत्या वाड्यातून पालखी संजीवन समाधी मंदिरात दाखल झाली. त्यानंतर ह.भ.प. मोहनानंद महाराज परंदवडेकर (पंढरपूर) यांच्या हरिनाम मय कीर्तनाने वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.

प्रस्थान सोहळ्यापूर्वी निळोबारायांच्या वाड्यातील विठ्ठल मंदिरात संत तुकाराम महाराजांचे वंशज माणिक महाराज मोरे, देहू संस्थानचे अध्यक्ष राम महाराज मोरे तसेच मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. जिल्हाधिकारी पंकज आशिया, आनंद भंडारी व पोलीस उपअधीक्षक वैभव कलबुर्गे यांच्या हस्ते महापूजा संपन्न झाली. अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, संध्या सोनवणे, हभप पूरंदवडेकर महाराज, हभप डॉ. विकासानंद मिसाळ महाराज, हभप कविराज महाराज झावरे, गंगाराम बेलकर, तहसीलदार गायत्री सौंदाणे, पो. नि.संतोष खेडकर, बिडीओ सोनकुसळे, प्रशांत गायकवाड, सुरेश पठारे, वसंत चेडे, जयशिंग मापारी, अशोक सावंत व संत निळोबारायांचे वंशज व सोहळा प्रमुख गोपाळ मकाशीर, लक्ष्मण खामकर, चांगदेव शिर्के, भाऊसाहेब श्रीरांल बळे, पत्रकार दत्ता गाडगे, सुरेश खोसे, विनोद गायकवाड तसेच जिल्हा प्रशासन, विविध मान्यवर, देवस्थानचे पदाधिकारी व राज्यभरातून आलेले लाखो वारकरी उपस्थित होते.

> श्री संत निळोबाराय देवस्थानाला भविष्यात अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि अदर्जा मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. संत निळोबाराय देवस्थानचे अध्यक्ष अशोक सावंत यांच्यावर माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचे विशेष प्रेम होते. अजितदादांच्या माध्यमातून आतापर्यंत श्रीक्षेत्र पिंपळनेर येथे विविध विकास कामे झाली. पर्यटन क्षेत्र विकास मधून मी या देवस्थानला जास्तीत जास्त निधी देण्याचा प्रयत्न करीन. **मा.ना.इंद्रनील नाईक**
> **मंत्री सार्वजनिक बांधकाम**



## वारकऱ्यांच्या हस्ते सलग १५ वर्षांपासून वृक्षारोपण व संवर्धन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पायी पालखी दिंडी क्र. ३ चे वाकोडी रोडवरील भोसले लॉन येथे भव्य रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या पुढाकारातून गेल्या २५ वर्षांपासून दिंडीतील वारकऱ्यांची दोन दिवस सेवा केली जात आहे.

टाळ-मृदुंगाच्या गजरात माऊली, तुकाराम आणि विठुरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. भगव्या पताका, महिलांच्या डोक्यावर सजविलेली तुळशी वृंदावने आणि वारकऱ्यांच्या फुगड्यांमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. गेल्या १५ वर्षांपासून वारकऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धनही करण्यात येत आहे.

यावेळी श्री निवृत्तीनाथ महाराज समाधी देवस्थान, त्र्यंबकेश्वरचे अध्यक्ष ह.भ.प. राहुल महाराज साळुंखे म्हणाले की, संत तुकाराम महाराजांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे या अभंगातून वृक्षांचे महत्त्व अधोरेखित केले. त्याच शिकवणीचे आचरण करत गणेश भोसले यांनी हा परिसर हरित व स्वच्छ केला आहे. वारकऱ्यांची सेवा हीच पांडुरंगाची सेवा असून संतांचा आध्यात्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बुरुडगाव परिसरात झालेल्या विकासकामांचेही त्यांनी कौतुक केले. ह.भ.प. एकनाथ महाराज गोळे यांनी सांगितले की, दिंडी गेल्या २५ वर्षांपासून बुरुडगाव परिसरात मुक्काम करत असून राहण्याची उत्तम व्यवस्था, आरोग्य सुविधा, महाप्रसाद तसेच विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडतात. यावेळी गणेश भोसले म्हणाले की, या दिंडीमुळे येथे पंढरपूर अवतरल्याचा भास होतो. वारकऱ्यांच्या माध्यमातून संतविचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचत आहे. यावर्षी स्व. मंदाताई भोसले यांच्या वर्षश्राद्धानिमित्त दहा ते पंधरा फूट उंचीची वृक्षलागवड करण्यात आली.

## कौशल्याधारित शिक्षण काळाची गरज : आ. कर्डिले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**अहिल्यानगर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण, संगणक साक्षरता आणि कौशल्याधारित प्रशिक्षण देत त्यांना रोजगारक्षम बनविण्याचे उल्लेखनीय कार्य राही कॉम्प्युटर अँड टायपिंग इन्स्टिट्यूट करत असून, अशा संस्था ग्रामीण भागासाठी प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन नगर-राहुरी-पाथर्डी मतदारसंघाचे आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले यांनी केले. राही कॉम्प्युटर अँड टायपिंग इन्स्टिट्यूटच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व चालू बॅचच्या निरोप समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य काशिनाथ हापसे तसेच मा. आमदार शिवाजीराव कर्डिले महाविद्यालयाचे अध्यक्ष किरण पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना आ. कर्डिले म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर प्रत्यक्ष कौशल्य, ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आत्मसात करणे आवश्यक आहे. मोबाईल आणि डिजिटल साधनांचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता स्वतःचे कौशल्य विकसित करण्यासाठी करावा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार संगणक शिक्षण उपलब्ध करून देण्याचे राही कॉम्प्युटर्सचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.

# लालटाकीला लहुजी वस्ताद साळवे यांचा पुतळा उभारणार

## नगरसेवक याचे आश्वासन ; महासभेत ठराव मंजूर करण्याची ग्वाही

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** बोल्हेगाव परिसर सकल मातंग समाजाच्या वतीने आयोजित 'मातंग ऐक्य मेळाव्यात लालटाकी परिसरातील आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे चौकात त्यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत उपस्थित सर्वपक्षीय नगरसेवकांनी जाहीर आश्वासन दिले. महानगरपालिका महासभेत तातडीने ठराव मंजूर करून पुतळा उभारणीची प्रक्रिया मार्गी लावली जाईल, अशी ग्वाही यावेळी लोकप्रतिनिधींनी दिली.

यावेळी भीमराव साळवे, मोहन गाडे, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नवनाथ कातोरे, नगरसेविका आशा कातोरे, किसन भिंगारदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मेळाव्यात ॲड. प्रदीप सकट यांनी आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळा उभारणीसंदर्भातील कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. आवश्यक कायदेशीर पूर्तता झाल्यानंतर महानगरपालिका महासभेत रीतसर ठराव मंजूर करून पुतळा उभारण्याची मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली. या मागणीला उपस्थित नगरसेवकांनी सकारात्मक प्रतिसाद देत महासभेत विषय मांडून पुतळा उभारणीसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी वक्त्यांनी आद्य क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि क्रांतिकारी कार्याचा गौरवपूर्ण इतिहास उलगडला. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण चळवळीत लहुजी वस्ताद यांनी दिलेले योगदान, नगरमधील कौठीची तालीम माळीवाडा परिसराशी असलेला ऐतिहासिक संबंध तसेच अन्यायाविरुद्ध त्यांनी उभारलेला संघर्ष यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला.

मेळाव्याचे प्रास्ताविक भगवान जगताप यांनी केले. संदीप सकट यांनी लहुजी वस्ताद यांच्या पुतळ्यासाठी सुरू असलेल्या संघर्षाचा आढावा घेतला, तर शाम वैराळ यांनी बोल्हेगाव परिसरातील समाजबांधवांच्या योगदानाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विशाल पाचरणे यांनी केले.



यावेळी डॉ. काशिनाथ सुलाखे, अनिल शेकटकर, नामदेवराव चांदणे, दादू नेटके, संजय चांदणे, जालिंदर शेलार, बाळासाहेब वाघमारे, सुनिल भोसले, दिनेश वैराळ, पावलस पवार, रामदास ठोकळ, रघुनाथ साळवे, राम वाघमारे, किशोर साळवे, वाल्मिक कसबे, सचिन कसबे, बबन जगधने, संदीप घोरपडे, सचिन लोखंडे, सचिन शिंदे, सुशीलजी खंडागळे, सुशीलजी साठे, योगेश महापुरे, बंडू साळवे, विनोदजी शिंदे, विकी वैराळ, विनोद शिंदे, रणजित वैरागर, सचिन शिंदे, संतोष शेंडगे, ताराचंद जगधने, किशोर साळवे, विजय वडगळे, गौरव घोरपडे, राहुल शेकटकर, विठ्ठल गाडे, लक्ष्मण साबळे, संजय उमाप, सचिन शेकटकर, अरुण डाके, संजय जगताप लक्ष्मण शिंदे यांच्यासह बोल्हेगाव परिसरातील सकल मातंग समाजाचे नागरिक आणि महिला भगिनी उपस्थित होत्या.

# अपघातग्रस्त वारकऱ्यांची उपमुख्यमंत्री पवार यांनी घेतली भेट

## मृतांच्या वारसांना पाच लाख रुपयांची मदत

## जखमींवर मोफत उपचार करण्याचे निर्देश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान आज सकाळी सासवड-जेजुरी मार्गावरील जेजुरी-बेलसर परिसरात झालेल्या अपघातात तीन वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर काही वारकरी जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी तातडीने जेजुरी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन जखमी वारकऱ्यांची विचारपूस केली.



यावेळी त्यांनी उपचाराधीन वारकऱ्यांच्या प्रकृतीची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून घेतली तसेच जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला दिल्या. अपघातात मृत्यू झालेल्या वारकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार असून जखमी वारकऱ्यांवर शासनाच्या वतीने मोफत उपचार करण्यात येतील. तसेच आवश्यकतेनुसार आर्थिक मदतही उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी जेजुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष जयदीप दिलीप बारभाई, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, श्री. भावार्थ देखणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या की, जखमी वारकऱ्यांच्या उपचारामध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासन अपघातग्रस्त वारकरी व त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.

आषाढी वारीच्या पूर्वतयारीचा नियमित आढावा घेऊन वारी मार्गावरील आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. पंढरपूरच्या दिशेने पायी निघालेल्या वारकऱ्यांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून वाहनचालकांनी अत्यंत सावधगिरीने वाहन चालवून वारकऱ्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहनही उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

## दखल

### महसूल मंत्री यांच्या हस्ते जेजुरी येथे वारकऱ्यांना हायजिनिक किटचे वाटप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** आषाढी वारीच्या निमित्ताने श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी यांच्या वतीने जेजुरी येथे पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना हायजिनिक किटचे वाटप करण्यात आले. वारकऱ्यांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षिततेचा विचार करून हा सेवा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी सचिव दत्तूजी समरीतकर तसेच संस्थानाचे विश्वस्त व मुख्य पुजारी केशवरावजी फुलझेले उपस्थित होतोरकरी संप्रदायाच्या सेवाभावाची परंपरा जपत, वारकऱ्यांच्या आरोग्य व स्वच्छतेला प्राधान्य देणारा हा उपक्रम भाविकांकडून विशेष कौतुकास पात्र ठरला.

### पत्नीचा खून करून फरार झालेल्या पतीला मंचर पोलिसांनी केली अटक



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** थोरांदळे ता.आंबेगाव येथे पत्नीचा निर्घृण खून करून फरार झालेल्या आरोपीला मंचर पोलिस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांच्या संयुक्त पथकाने अवघ्या काही दिवसांत अटक केली. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. मंचर पोलिस ठाण्याचे हद्दित थोरांदळे येथे ७ जुलै २०२६ रोजी घडलेल्या या घटनेत सपना दीपक पारधी (वय ३५) या महिलेचा तिचा पती दीपक गेनबा पारधी याने डोक्यावर, मानेवर, छातीवर आणि पोटावर लोखंडी गजाने वार करून खून केल्याचा आरोप आहे. खून केल्यानंतर आरोपी फरार झाला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मंचर पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेचे संयुक्त पथक तयार करण्यात आले. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला. तपासादरम्यान आरोपी आंबेगाव तालुक्यातील वळती परिसरात नातेवाईकांकडे लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून ११ जुलै २०२६ रोजी आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

### शिंगवे येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ गाव बंद




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिंगवे :** आंबेगाव तालुक्यातील शिंगवे येथे चार वर्षीय अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाच्या घटनेच्या निषेधार्थ रविवारी (दि. १२) संपूर्ण गाव बंद ठेवण्यात आले. ग्रामस्थ तसेच विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने सायंकाळी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात गावातील नागरिक, महिला, युवक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी गावात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.मोर्चानंतर आयोजित जाहीर सभेला आमदार गोपीचंद पडळकर, ह.भ.प. संग्राम बापू भंडारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. या प्रकरणातील आरोपी परप्रांतीय सलून कामगार मोहम्मद फरदीन फरीद शाह (वय २०) तसेच त्याच्या सहकाऱ्यावर कठोर कारवाई करून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी मोर्चादरम्यान करण्यात आली.शिंगवे गावातून काढण्यात आलेल्या या मोर्चात ग्रामस्थांसह विविध सामाजिक व धार्मिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

### दूधभेसळखोरांवर कारवाईची मागणी; मंचरमध्ये सर्वपक्षीय एल्गार मोर्चा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मंचर :**दूधभेसळ माफियांच्या विरोधात मंचर शहरात शनिवारी सर्वपक्षीय 'एल्गार मोर्चा' काढण्यात आला. भेसळखोरांवर कठोर कारवाई करावी तसेच आंबेगाव व मंचरची बदनामी झाल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी सभापती देवदत्त निकम यांनी केली. मंचर कृषी उत्पन्न बाजार समिती येथून निघालेला मोर्चा लक्ष्मी रस्तामार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचला. यानंतर झालेल्या जाहीर सभेत विविध मान्यवरांनी आपली मते मांडली.देवदत्त निकम यांनी दूधभेसळीमुळे परिसरात कॅन्सर व त्वचारोगाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप केला. दूधभेसळ पूर्णपणे थांबविल्यास दुधाचे दर प्रतिलिटर पाच रुपयांनी वाढून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच रासायनिक पदार्थयुक्त दुधामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाल्याचेही त्यांनी नमूद केले.सुरेश भोर यांनी भेसळखोरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.



# धामणीतील गाढवे मळा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित

## कमी दाबाच्या वीज समस्येला अखेर पूर्णविराम

**लोणी धामणी :** धामणी ( ता . आंबेगाव ) येथील गाढवे मळा परिसरात अनेक वर्षांपासून नागरिकांना भेडसावत असलेल्या कमी दाबाच्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर अखेर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. परिसरात १०० केव्ही क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आल्याने घरगुती वीजपुरवठा सुरळीत झाला असून शेतकऱ्यांच्या मोटारपंपांनाही पुरेशा दाबाने वीज मिळू लागल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या प्रयत्नातून ग्रामपंचायत सदस्य प्रतिक जाधव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागल्याची माहिती अशिष गाढवे यांनी दिली.गाढवे मळा परिसरात यापूर्वी अपुऱ्या क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरमुळे वारंवार कमी दाबाचा वीजपुरवठा होत होता. परिणामी घरातील विद्युत उपकरणे व्यवस्थित चालत नव्हती. तसेच शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटारपंप पूर्ण क्षमतेने सुरू होत नसल्याने शेतीच्या कामांवर परिणाम होत होता. नवीन १०० केव्ही ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित झाल्यानंतर वीजपुरवठ्यात लक्षणीय सुधारणा झाली असून नागरिक व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.यावेळी धामणीचे लोकनियुक्त सरपंच प्रतीक्षा राजेंद्र जाधव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आंबेगाव तालुका सरचिटणीस भाऊसाहेब करंडे, गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर देविदास करंजखेले, वि.वि.का. सोसायटीचे तज्ज्ञ संचालक सदाशिव गाढवे, किरण गाढवे, दिनकर गाढवे, सुनील गाढवे, लक्ष्मण गाढवे, हर्षद गाढवे, अनिता गाढवे, माया गाढवे, छाया गाढवे तसेच परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या संस्थेत वर्ध्यातील तीनशे वारकऱ्यांना वैदर्भीय पुरणपोळीचा पाहुणचार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** वारी म्हणजे केवळ पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनाची वाटचाल नव्हे, तर माणुसकी, सेवा, समता आणि प्रेमाचा अखंड उत्सव होय. अनाथांच्या जीवनात मायेचा दीप प्रज्वलित करणाऱ्या पद्मश्री डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ यांनी जपलेली हीच मानवतेची परंपरा आजही त्यांच्या संस्थेत तेवढ्याच प्रेमाने आणि आत्मीयतेने जोपासली जात आहे. त्यांच्या जन्मभूमी असलेल्या वर्धा जिल्ह्यातून संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा-२०२६ निमित्त आळंदी ते पंढरपूर पायी वारी करणाऱ्या तब्बल ३०० वैदर्भीय वारकऱ्यांचे सासवडजवळील कुंभारवळण येथील ममता बाल सदन (बालगृह) येथे पारंपरिक वैदर्भीय पुरणपोळीच्या स्वादिष्ट भोजनाने स्वागत करण्यात आले. माईंच्या विचारांची ही सेवा-परंपरा सलग २७ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे.



पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण येथील संस्थेत वारकऱ्यांचा दोन दिवस मुक्काम होता. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदनचे अध्यक्ष दिपक दादा गायकवाड, ममता सपकाळ, सौ. सुजाता गायकवाड, अधीक्षिका स्मिता पानसरे यांनी अत्यंत आत्मीयतेने वारकऱ्यांचे स्वागत केले. रविवारी (१२ जुलै) वारकऱ्यांसाठी वैदर्भीय परंपरेनुसार पुरणपोळी, चपाती, पातोळीची भाजी, कढी, पालक व कांदा भजी, वरण-भात, सलाड अशा रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली. रात्री काल्याचे कीर्तन, हरिपाठ आणि भक्तिरसाने ओथंबलेल्या वातावरणात वारकरी संप्रदायाचा आध्यात्मिक सोहळा रंगला. सोमवारी (१३ जुलै) सकाळी आठ वाजता ज्ञानोबा-तुकारामच्या अखंड जयघोषात ही दिंडी जेजुरीमार्गे पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी आश्रमातील मुलींनी पावली, फुगडी आणि अभंगांच्या गजरात वारकऱ्यांना भावपूर्ण निरोप दिला. सेवा आणि भक्तीचा संगम अनुभवत अनेक वारकरी भारावून गेले.

### वारकऱ्यांची सेवा हेच माझे भाग्य

**पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी १९९३ मध्ये पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण येथे ममता बाल सदन (बालगृह) या संस्थेची स्थापना केली. तेव्हापासून दरवर्षी वर्धा जिल्ह्यातील वारकरी दिंडीचा मुक्काम या संस्थेत होत असून, यंदा या सेवेला २७ वर्षे पूर्ण झाली. वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे माझे परमभाग्य आहे. माईंच्या हातून सुरू झालेली ही माणुसकीची परंपरा अखंड सुरू ठेवणे, हेच आमचे कर्तव्य आहे. त्यांनी दिलेला सेवा, प्रेम आणि मानवतेचा वारसा श्वासाच्या अखेरच्या क्षणापर्यंत जपत राहू. समाजानेही या सेवायज्ञात सहभागी होऊन माईंच्या विचारांची ज्योत अधिक तेजस्वी करावी, हीच आमची अपेक्षा आहे.**

**– दिपकदादा गायकवाड,** पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र

# अमृत-सक्षम उपक्रमातून कचरा व्यवस्थापन क्षेत्रात उद्योजकतेची सुवर्णसंधी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्रात कचरा व्यवस्थापन क्षेत्रात उद्योजकतेला चालना देण्यासाठी 'अमृत' (-चठणढ) आणि 'कुशाग्र इनोव्हेशन्स फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत-सक्षम' हा विशेष उद्योजकता विकास उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक-युवती, महिला, स्वयंसेवी संस्था, व्यावसायिक तसेच पर्यावरणप्रेमी नागरिकांना कचरा व्यवस्थापन क्षेत्रात शाश्वत उद्योग उभारण्यासाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि विविध योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे. वाढते शहरीकरण आणि पर्यावरणीय नियमांमुळे कचरा व्यवस्थापन क्षेत्रात व्यवसायाच्या मोठ्या संधी निर्माण झाल्या असून, कचरा ही समस्या नसून उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत ठरू शकतो. सुकलेल्या फुलांपासून अगरबत्ती व धूपनिर्मिती, प्लास्टिक, कागद व काच पुनर्वापर (रिसायकलिंग), तसेच रिसोर्स रिकव्हरी सेंटर (ठठठ) उभारणीसारख्या व्यवसायांद्वारे रोजगार आणि उत्पन्नाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.'अमृत-सक्षम' उपक्रमांतर्गत इच्छुकांना व्यवसायाची निवड, आर्थिक नियोजन, बँक कर्ज प्रक्रिया, शासकीय योजना व अनुदानाचा लाभ, तसेच उत्पादनासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबत टप्प्याटप्प्याने मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हा उपक्रम केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित नसून संकल्पनेपासून प्रत्यक्ष उद्योग उभारणीपर्यंत सर्वंकष सहकार्य देणारा आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून राज्यात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून पीक विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ पर्यंत राहील. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजूरकर यांनी केले आहे.खरीप हंगामातील भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळे, कापूस व खरीप कांदा या १४ अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना सहभाग घेता येईल. विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी ईसेवा केंद्रास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत ई सेवा केंद्रास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क अदा करु नये.योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांचा ॲग्रिस्टॅक नोंदणी क्रमांक आणि डिजिटल क्रॉप सर्वे करणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांना विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के विमा हप्ता भरून सहभाग नोंदवावा लागेल. कापूस व कांदा या व्यापारी पिकांसाठी हा विमा हप्ता विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्के राहील.

# चौकशीचा फार्स नको, संबंधित अधिकाऱ्यांसह कंपनीवर गुन्हा दाखल करा : सुषमा अंधारे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोशी येथे असलेल्या कचरा डेपोमध्ये बुधवारी (दि. ८ जुलै) दुपारी कचऱ्याचा डोंगर कोसळून येथील अनधिकृत इमारतीखाली चिरडून ९ कामगारांचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेस महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर आणि वेस्ट टू एनर्जी प्रकल्प राबविणाऱ्या अँटनी लारा या कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना सक्षम मदत द्यावी. अन्यथा उच्च न्यायालयात दाद मागू आणि वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी दिला.रविवारी (दि. १२ जुलै) चिंचवड येथे पत्रकारांशी संवाद साधताना सुषमा अंधारे बोलत होत्या. यावेळी शिवसेना शहर प्रमुख चेतन पवार व शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. तत्पूर्वी या घटनेत जखमी झालेल्या मृत कामगारांच्या कुटुंबीयांची सुषमा अंधारे यांनी भेट घेऊन सांत्वन केले आणि जखमी कामगारांना भेटून विचारपूस केली. मोशी येथे झालेली घटना निसर्गनिर्मित नाही तर मानवनिर्मित आहे. या संपूर्ण प्रकरणात पालिका आयुक्तांनी अधिकृतरित्या पत्रकार परिषद किंवा एखादे निवेदन सादर करून लोकांना माहिती देणे अपेक्षित होते, की घटनास्थळी एकूण किती लोक होते, त्यातून सुखरूप किती बाहेर काढले, किती जखमी आहेत, किती लोक मृत्युमुखी पडले, या इमारतीचे नेमके स्टेटस काय याची कशाचीही माहिती लोकांना दिली गेली नाही. या सगळ्या प्रकरणातून पालिका आयुक्तांनी पळ काढला आणि प्रकल्प अधिकारी संजय कुलकर्णी यांनी यावर बोलणे शिताफीने टाळले. मोशी येथील या इमारतीचे फक्त तळमजल्याचे कम्प्लीएशन सर्टिफिकेट घेतले असताना दोन मजले विनापरवाना बांधले. त्या इमारतीचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे होते.

# पुणे मेट्रोतील कंत्राटी कामगारांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतनवाढ लागू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे मेट्रो रेल प्रकल्पातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतन लागू करण्याच्या दीर्घकालीन मागणीला अखेर यश आले असून, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (चरहर-चर्शीं) यांनी पुणे मेट्रोतील पात्र कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतन लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेत अंमलबजावणी सुरू केली आहे. या निर्णयामुळे कामगारांच्या वेतनात लक्षणीय वाढ झाली असून, हा निर्णय पुणे मेट्रोतील कंत्राटी कामगारांसाठी ऐतिहासिक ठरणार आहे.



पुणे मेट्रो रेल कामगार संघ रजि ५२९९ दि १०/०९/२०२५ (संलग्न भारतीय मजदूर संघ) यांनी या मागणीसाठी सातत्याने महाराष्ट्र शासन, माननीय कामगार मंत्री तसेच मेट्रो व्यवस्थापनाकडे पाठपुरावा केला होता. यापूर्वी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या Shops and Establishments नियमांनुसार वेतन दिले जात होते. मात्र, कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटनेने सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे आता केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतन लागू करण्यात आले आहे.या ऐतिहासिक निर्णयाबद्दल पुणे मेट्रो रेल कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) यांच्या वतीने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. श्रावण हर्डीकर तसेच मानव संसाधन विभागाचे (क्ठ) वरिष्ठ अधिकारी श्री. उत्तमराव बोडके यांचा वृक्षाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्यवस्थापनाने कामगारांच्या हितासाठी घेतलेल्या सकारात्मक निर्णयाचे स्वागत करण्यात आले.सत्कार समारंभास पुणे मेट्रो रेल कामगार संघाचे अध्यक्ष राम सुरवसे, जनरल सेक्रेटरी सचिन मेंगाळे, भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ, उमेश विश्वाद, कैलास मोरे, सुवर्णा भोसले, विल्यम आणि ऋषीकेश यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संपूर्ण प्रक्रियेत निकिता दंडवते, कैलास मोरे, गौरी साळुंखे, योगिता देवणे, यश निंबाळकर आणि रेखा फडके , रवींद्र वाघोले , राज शेलार , लक्ष्मण गवस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण समन्वय, पाठपुरावा आणि संघटनात्मक कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. संघटनेच्या वतीने त्यांच्या योगदानाबद्दल सर्व कामगारांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी केंद्रीय वेतनश्रेणीची अंमलबजावणी करून त्यांच्या वेतनात ऐतिहासिक वाढ घडवून आणल्याबद्दल महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापनाचे तसेच या मागणीसाठी सातत्यपूर्ण नेतृत्व, मार्गदर्शन आणि संघर्ष करणाऱ्या भारतीय मजदूर संघ व पुणे मेट्रो रेल कामगार संघ यांच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. संघटनेने स्पष्ट केले की, भविष्यातही पुणे मेट्रोतील सर्व कंत्राटी कामगारांना न्याय्य वेतन, सामाजिक सुरक्षा, सेवा संरक्षण आणि इतर कायदेशीर हक्क मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघाचा संघर्ष आणि सकारात्मक संवाद यापुढेही अविरत सुरू राहील.

## ॥ विठ्ठला ॥



विटेवरून खाली येऊन, हात कंबरेवरचा काढ देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा मातीमध्ये गाड देवा
भाकरीच्या कष्टामागे, भुकेचे रोज वादळ उभे
लुटारूंच्या राजवाड्यांना, सोन्याचे दरवाजे नवे
कष्टकऱ्यांच्या रित्या हाती, जगण्याचा दे आधार देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा मातीमध्ये गाड देवा
खुर्चीसाठी लाचार सारे, रोजच इथे लिलाव होतो
सत्याला लाथ मारून, खोट्याचाच विजय होतो
जनतेच्या या आक्रोशाला, न्यायाचा दे आधार देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा मातीमध्ये गाड देवा
कायद्याच्या पायरीवरती, पैशाचाच दरबार भरतो
निर्दोषांच्या हुंदक्यांवरती, गुन्हेगार मोकाट फिरतो
न्यायदेवतेच्या डोळ्यांमध्ये, अंजन सत्याचे घाल देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा मातीमध्ये गाड देवा
नोकरीच्या प्रत्येक दारी, वशिल्याचाच बाजार भरला
गुण, कष्ट, प्रामाणिकपणा, आज फासावर चढला
तरुणाईच्या या स्वप्नांना, धैर्याचा दे हुंकार देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा मातीमध्ये गाड देवा
धर्मामधले व्यापारी सारे, देवालाही घेती वाटून
जातीपातीच्या भिंती बांधून, माणुसकीला टाकती छाटून
भक्तीच्या या मंदीराला, प्रेमाचा दे गाभारा देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा मातीमध्ये गाड देवा
कसा उभा रे विटेवरती? किती मुक्याने पाहशील?
द्रौपदीचे वस्त्रहरण आता, कितीदा सहन करशील?
सुदर्शन नसेल हाती तरी , न्यायाचा वज्र उगार देवा
भ्रष्ट इथल्या व्यवस्थेला, एकदा मातीमध्ये गाड देवा

**-आकाश हरिभाऊ भोरडे**
मु.पो. निमगाव म्हाळुंगी, ता. शिरूर,
जि.पुणे-४१२२०९, मो.नं. ९१५६७१५२७५

## द • ख • ल

### प्रा. फकीर यांचा सेवापूर्ती गौरव



**शिराळ चिचोंडी :** श्री आनंद विद्यालय चिचोंडी तालुका पाथर्डी येथे दिनांक १२,७,२०२६रोजी श्रीदिलवर फकीर यांचा सेवापूर्ती सोहळा अत्यंत उत्साह पूर्व व भावनिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी ती लोक जैन संस्थेचे सेक्रेटरी सतीश जी गुगळे,सुरेश कुचोरिया राजू शेठ मुथा धरमचंदजी गुगळे ललित गुगळे प्रमोद गुगळे कमलेश गुगळे गीते सर देखणे सर छाजेड सर घोरपडे सर गाडेकर सर टाक सर,सोहेल फकीर फकीर मॅडम,उद्धव काळापहाड,बबन गोरावडेआदीउपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना बोरुडे आर एनत्यांनी केलीफकीर सर यांनी पाथर्डी माणिकदौंडी व चिचोंडी येथे आपलीसेवा केली व चिचोंडी येथे प्राचार्य पदी निवड होऊन सेवा पूर्ती सुद्धा चिचोंडी येथे पूर्ण केली.

### चिचोंडी पाटील सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी पवार बिनविरोध



**चिचोंडी पाटील :** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील सेवा सोसायटीचे मा.चेअरमन संदिप कोकाटे यांनी राजीनामा दिल्यामुळे सेवा सोसायटीच्या रिक्त असलेल्या चेअरमनपदी दिलीप पवार यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीबद्दल त्यांचा प्रविण कोकाटे, आबासाहेब कोकाटे, मच्छिंद्र खडके, डॉ.ययाती फिसके, राजेश परकाळे, चंद्रकांत पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी संदिप कोकाटे, महादेव खडके, डॉ.मारुती ससे, बबनराव कोकाटे, काशिनाथ वाडेकर, काशीनाथ बेल्हेकर, अर्जुन वाडेकर, पंडितराव कोकाटे, अंबादास फिसके, चंद्रकांत सदाफूले, कासम सय्यद, महेश जगताप, दत्ता झांबरे, संतोष कोकाटे, प्रशांत लबडे आदींसह सभासद व ग्रामस्थ उपस्थित होते.

### व्यंकनाथ विद्यालयात जागर युवा प्रतिष्ठानकडून शालेय साहित्य वाटप



**लिंपणगाव :** जागर युवा प्रतिष्ठानच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री व्यंकनाथ विद्यालय मधील दहा विद्यार्थ्यांनची विद्यालयीन शिक्षणाचे पूर्ण जबाबदारी जागर युवा प्रतिष्ठानने घेतली आहे. त्यांच्या शालेय किटचे वाटप लोणी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन बाळासाहेब थोरात, राजेंद्र भागवत, ज्ञानदेव मगर, राजू कुदांडे, पंढरीनाथ खंडागळे, चित्रा धाकड पवार, कल्पना काकडे, अनिल खेडेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

### चिचोंडी पाटीलच्या श्रीराम तीर्थ प्रासादिक पायी दिंडीचे प्रस्थान

**चिचोंडी पाटील :** श्री संत सद्गुरू गणेशनाथ महाराज यांच्या कृपेने, ह.भ.प. स्वामी शामसुंदर पुरी महाराज यांच्या प्रेरणेने आणि ह.भ.प. स्वामी रामानंद पुरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली चिचोंडी पाटील येथील श्रीराम तीर्थ प्रासादिक पायी दिंडी सोहळ्याचे गुरुवारी श्री क्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान होणार आहे.

# विठू नामाच्या गजरात न्हाऊन निघाला संभाजीनगर महामार्ग !

## भगव्या पताका, टाळ-मृदुंगाचा निनाद, ज्ञानोबा-तुकाराम जयघोष ; वारकऱ्यांचा पंढरीकडे भक्तिमय प्रवास

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** आषाढी वारीच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर महामार्ग सध्या विठ्ठल भक्तीच्या अविरत प्रवाहाने भारावून गेला आहे. खानदेश, मराठवाडा आणि राज्याच्या विविध भागांतून शेकडो दिंड्या व लाखो वारकरी या महामार्गाने पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करत असून संपूर्ण परिसर ज्ञानोबा-तुकाराम...माऊली-माऊली...आणि विठ्ठल... विठ्ठल... या अखंड नामघोषाने दुमदुमून गेला आहे.

डोक्यावर भगव्या पताका, हातात टाळ-मृदुंग, मुखी हरिनाम आणि हृदयात विठुरायाच्या दर्शनाची ओढ घेऊन वारकरी



ऊन, वारा आणि पावसाची कोणतीही पर्वा न करता पायी वाटचाल करत आहेत. प्रत्येक पावलागणिक भक्ती, समर्पण आणि शिस्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळत आहे. संसारातील सुख-दुःख, चिंता आणि मोह बाजूला ठेवून केवळ विठ्ठल भेटीचा ध्यास घेतलेले वारकरी भक्तिभावाने मार्गक्रमण करत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

महामार्गालगत अनेक गावांमध्ये सडा-रांगोळी, फुलांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि टाळ्यांच्या गजरात वारकऱ्यांचे स्वागत होत आहे. विविध सामाजिक संस्था, मंडळे आणि ग्रामस्थांनी उभारलेल्या मदत केंद्रांवर पिण्याचे पाणी, फराळ, चहा, वैद्यकीय सेवा आणि विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली आहे. वारकऱ्यांची सेवा म्हणजे विठ्ठलाची सेवा या भावनेतून अनेक स्वयंसेवक निस्वार्थपणे सेवाकार्यात सहभागी झाले आहेत.

वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग आणि स्थानिक यंत्रणा दक्ष असून, संपूर्ण मार्गावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न होताना दिसुन येत आहे. लाखोंची गर्दी असूनही दिंड्यांमधील शिस्त, परस्पर सहकार्य आणि भक्तीमय वातावरण सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

छत्रपती संभाजीनगर महामार्ग सध्या विठ्ठल भक्तीच्या रंगात रंगून गेला असून प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर पंढरीच्या भेटीचा आनंद आणि विठुरायाच्या दर्शनाची आतुरता स्पष्टपणे दिसून येत आहे.

**वारकऱ्यांची सेवा म्हणजे विठ्ठलाची सेवा !**

महामार्गावर उभारलेल्या मदत केंद्रांमध्ये ग्रामस्थ, सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि स्वयंसेवक मोठ्या श्रद्धेने वारकऱ्यांची सेवा करत आहेत. पिण्याचे पाणी, अल्पोपहार, वैद्यकीय मदत, विश्रांतीची व्यवस्था अशा विविध सुविधांमुळे सेवाभावाचे प्रेरणादायी दर्शन घडत आहे.

**दिंडीतील शिस्त वारकरी संप्रदायाची खरी ओळख !**

लाखोंच्या संख्येने वारकरी सहभागी असूनही दिंड्यांमध्ये अनुशासन, स्वच्छता, परस्पर सहकार्य आणि भक्तीचा सुंदर संगम दिसून येतो. माऊली... माऊली...च्या अखंड नामघोषात विठ्ठल भेटीची ओढ प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर झळकत असून हीच वारीची खरी आध्यात्मिक परंपरा असल्याची अनुभूती महामार्गावर येत आहे.

# बंदिस्त शेळीपालन फार्मवर बिबट्यांचा हल्ला



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

### दोन शेळ्या ठार, दोन पिल्ले फस्त

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील राजापूर येथील मेंगलवाडी शिवारात असलेल्या शेतकरी संदीप भीमराव मेंगवडे यांच्या एम.बी. गोट फार्म या बंदिस्त शेळीपालन व्यवसाय वर १२ जुलै रोजी मध्यरात्री दोन बिबट्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात दोन मोठ्या शेळ्या जागीच ठार झाल्या, तर दोन लहान शेळ्या (पिल्ले) बिबट्यांनी उचलून नेल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बिबट्यांनी शेळीपालनासाठी उभारण्यात आलेल्या तार कंपाऊंडवरून आत प्रवेश करून शेळ्यांवर हल्ला केला. हल्ला इतका अचानक झाला की दोन मोठ्या शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन लहान शेळ्या बिबट्यांनी फस्त केल्या.संदीप भीमराव मेंगवडे यांनी सुमारे वर्षभरापूर्वी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून बंदिस्त शेळीपालन सुरू केले होते. यासाठी त्यांनी राजस्थान येथून सोजत जातीच्या पाच शेळ्या व एक बोकड आणला होता. या व्यवसायासाठी त्यांचा दीड लाख रुपयांहून अधिक खर्च झाला होता. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी हनुमंत रणदिवे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच डॉ. लोंढे यांनीही पाहणी केली.यावेळी सुरेश मेंगवडे,धनंजय मेंगवडे, तुषार धावडे, दिलीप वीर, संपत धावडे, विलास मेंगवडे यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. परिसरात बिबट्यांचा वाढता वावर लक्षात घेता वनविभागाने तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# 'वीज बचतीचा फक्त गाजावाजा?' रिकाम्या दालनात दिवे-पंखे सुसाट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** एकीकडे राज्य सरकार वीज बचतीचा संदेश देत नागरिकांना सौरऊर्जे कडे वळविण्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवत आहे. दुसरीकडे श्रीगोंदा तालुका कृषी कार्यालयात मात्र शासकीय विजेची सर्रास उधळपट्टी होत असल्याचे चित्र सोमवारी सकाळी पाहायला मिळाले. अधिकारी दालनात नसतानाही दिवे आणि पंखे सुरू असल्याने सरकारी कार्यालयात वीज बचतीच्या नियमांना हरताळ फासला जात असल्याची चर्चा रंगली आहे.



- श्रीगोंदा कृषी कार्यालयाचा कारभार पुन्हा चर्चेत!
- सरकार सौरऊर्जेसाठी कोट्यवधी खर्च करतेय
- तालुका कृषी अधिकारी बैठकीत
- दालनात मात्र दिवसभर वीजेची उधळपट्टी

तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी यांच्या दालनात त्या उपस्थित नसतानाही दोन बल्ब, तीन ट्यूबलाईट आणि दोन पंखे सुरू असल्याचे दिसून आले. त्यामुळे शासकीय वीज म्हणजे मोफत माल आहे का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

याबाबत तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसंदर्भातील बैठक तहसील कार्यालयात सुरू असल्याने त्या बैठकीला उपस्थित असल्याचे सांगितले. मात्र, अधिकारी बाहेर असताना दालनातील दिवे-पंखे का सुरू ठेवण्यात आले, सरकारी कार्यालयांमध्ये वीज बचतीचे नियम पाळले जात नसतील, तर सामान्य नागरिकांनी ऊर्जा बचतीचा संदेश कितपत गांभीर्याने घ्यावा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# चोरट्यांचा मोर्चा आता बळीराजाच्या पशुधनाकडे !

## जेऊरमध्ये गोठ्यातून दोन शेळ्यांची चोरी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** पावसाने मारलेली दडी..खरीप रब्बी हंगामाबाबत संकट... पिण्याच्या पाण्याची समस्या.... चाऱ्याचा प्रश्न यामुळे शेतकरी त्रस्त आहे. त्यातच चोरट्यांनी पशुधनाकडे मोर्चा वळविल्याचे समोर आले आहे. जेऊर येथील लिगाडे वस्तीवर सोमवारी (दि. १३ जुलै) रात्री एक वाजण्याच्या सुमारास गोठ्यातून दोन शेळ्या चोरून नेण्याचा प्रकार घडला. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जेऊर परिसरातील छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असणाऱ्या लिगाडे वस्ती येथील शेतकरी भाऊसाहेब दशरथ तोडमल यांच्या गोठ्याला चोरट्यांनी लक्ष्य केले. चोरट्यांनी



घराला बाहेरून कडी लावून गोठ्यात प्रवेश केला आणि दोन शेळ्या घेऊन पसार झाले.

शेळ्यांच्या ओरडण्याचा आवाज आल्याने शेजारी राहणारे खंडू तोडमल तसेच इतर नागरिक जागे झाले. नागरीकांची चाहूल लागताच चोरट्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. पशुधनावरही चोरट्यांची नजर गेल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. तालुक्यात यापूर्वी विद्युत पंप, केबल, शेती अवजारे तसेच धान्य चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. आता पशुधन चोरीचे प्रकार सुरू झाल्याने ग्रामीण भागातील शेतकरी अधिकच अस्वस्थ झाले आहेत. रात्रीच्या वेळी ग्रामीण भागात पोलिसांनी गस्त वाढवून अशा चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**शेतकऱ्यांच्या कष्टावर चोरट्यांचा डोळा !**

वीजपंप, केबल, शेती अवजारे आणि धान्य चोरीच्या घटनांमुळे बळीराजा त्रस्त असतानाच आता चोरट्यांनी पशुधनालाही लक्ष्य केल्याने ग्रामीण भागातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांच्या कष्टाने उभ्या केलेल्या संपत्तीवर डल्ला मारणाऱ्या टोळ्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

# महापुरुषांबाबतच्या आक्षेपार्ह लिखाणाविरोधात तिसगावात निषेध सभा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव :** पाथर्डी तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी सोशल मीडियावर करण्यात आलेल्या आक्षेपार्ह लिखाणाचा तसेच नाशिक येथे मुस्लिम समाजाचे श्रद्धास्थान पैगंबर मोहम्मद यांच्याविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह विधानाचा निषेध करण्यासाठी तिसगाव येथे निषेध सभेचे आयोजन करण्यात आले. सभेत प्रदीप ससाणे व माजी सरपंच भाऊसाहेब लोखंडे यांनी समाजात तेढ निर्माण करणाऱ्या अशा प्रकारांना आळा बसावा,




यासाठी संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून कडक शिक्षा व्हावी, अशी मागणी केली. विक्रम ससाणे व अक्षय साळवे यांनी तिसगाव ही मोठी बाजारपेठ असून यापूर्वी शाळकरी मुलींची छेडछाड व महिलांच्या अपहरणासारख्या घटना घडल्याचे नमूद केले. तसेच बाजारपेठेतील व्यापारी सुरज वांढेकर यांच्या नावाशी संबंधित सोशल मीडिया प्रकरणामुळे तिसगावची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी संजय लवांडे, शंकर कातखडे, विक्रम ससाणे, रमेश नरवडे, वाहब इनामदार, नितीन लवांडे, सचिन खंडागळे, सुनील ससाणे, सुनील लवांडे, सतीश साळवे, शंकरराव उंडाळे, दिलीप गांधी, अस्लम शेख, वाहिद पठाण, अशोक भडके, अकबर शेख, अमोल वाबळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# नाट्यमय घडामोडींनंतर ढवळगावात जिल्हा बँकेचा ठराव तहकूब

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** ढवळगाव, ता. श्रीगोंदा, दि. १३ जुलै : अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या निवड प्रक्रियेसंदर्भातील ठराव मंजूर करण्यासाठी श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची सभा सोमवारी आयोजित करण्यात आली होती. मात्र, सभेपूर्वी झालेल्या नाट्यमय घडामोडी, सभास्थळावरून निर्माण झालेला वाद आणि संचालकांच्या अनुपस्थितीमुळे आवश्यक कोरम पूर्ण न झाल्याने संबंधित ठराव तहकूब करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला कोणत्याही संचालक व सभासद यांना विश्वासात न घेता ही सभा अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ढवळगाव शाखेत घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यास पाचपुते गटाच्या संचालकांनी आक्षेप घेतला. विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे स्वतंत्र कार्यालय उपलब्ध असताना आणि नियमित सभा तेथेच होत असताना अचानक बँकेच्या शाखेत सभा घेण्याचा निर्णय का घेण्यात आला, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यानंतर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सचिव संतोष कातोरे यांनी सर्वांच्या सहमतीने सभा सोसायटीच्या कार्यालयात घेण्याचा निर्णय जाहीर केला.

**जाहीर प्रगटन**

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर/१०५/२०२६
नेवासा दिनांक ०३/०७/२०२६

अर्जदार **श्री/श्रीम-अशोक कारभारी वीर रा.कांगोणी ता. अहिल्यानगर** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. समर्थ अशोक वीर रा. कांगोणी ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ. क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | समर्थ अशोक वीर | सोनई | ०७/११/२०२० |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

**जाहीर प्रगटन**

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांकः 'जन्म-मृत्यु एसआर १७२/२०२६
नेवासा दिनांक- ०८/०७/२०२६

अर्जदार **श्री/श्रीम - जमीर कचरु शेख रा. प्रवरासंगम ता. नेवासा** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. सुबानबी मुनीर शेख महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये **मृत्यु** नोंद गावी जन्म - मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म-मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | मृत्यु दिनांक |
|---|---|---|---|
| १. | कै. सुबानबी मुनीर शेख | प्रवरासंगम | ७/५/२०१२ |

करिता या जाहिर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये **मृत्यु** नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
शिक्का
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# जात,धर्म, पंथ विसरत माणुसकीत रंगला वारकऱ्यांच्या मेळावा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडीत यंदा कर्जत तालुक्यातील दोन मुस्लिम कुटुंबांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक सलोखा आणि धार्मिक ऐक्याचा प्रेरणादायी संदेश दिला. हडपसर ते सासवड या टप्प्यातील सुमारे ३५ किलोमीटरचा प्रवास त्यांनी वारकऱ्यांसोबत पूर्ण केला. या कर्जतकरांच्या वारीचे विशेष आकर्षण ठरला तो अवघ्या १० वर्षांचा अझर पठाण. कठीण समजला जाणारा दिवे घाट त्याने कोणताही थकवा न जाणवू देता उत्साहाने पार केला. लहान वयात दाखवलेले त्याचे धैर्य, चिकाटी आणि वारकरी भावनेप्रती असलेला आदर पाहून अनेक वारकरी त्याचे कौतुक करत होते.

वारकरी संप्रदाय हा प्रेम, समता,



बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. या परंपरेत सहभागी झालेल्या मुस्लिम कुटुंबांनी धर्म वेगळा असला तरी माणुसकी आणि परस्पर सन्मान हेच खरे मूल्य असल्याचा संदेश कर्जतच्या दोन मुस्लिम कुटुंबानी आपल्या कृतीतून दिला. दरवर्षी कर्जत शहरातील विविध क्षेत्रात काम करणारे १० ते १२ वारकरी जोडपे सहकुटुंब संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडीत अड नंदकुमार लांगोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हडपसर ते सासवड या एकदिवसाच्या वारीत मोठ्या भक्तिभावाने सहभागी होतात. कर्जतचे सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक शकुर सय्यद आणि पत्रकार डॉ अफरोजखान पठाण हे मुस्लिम कुटुंब देखील या वारीत नित्यनियमाने कपाळी गंध, भजन-कीर्तनात तल्लीन होत वारीमध्ये भक्तीच्या रसात न्हावून निघतात. यंदा डॉ अफरोजखान पठाण यांचा अवघ्या १० वर्षाचा अझर आपल्या आई-वडिलांसोबत या पायी दिंडीत सहभागी झाला. हडपसर ते सासवड या टप्प्यातील कठीण समजला जाणारा दिवे घाट त्याने कोणताही थकवा न जाणवू देता उत्साहाने पार केला. सुमारे ३५ किलोमीटरचा प्रवास त्यांने माऊलींच्या वारकऱ्यांसोबत लीलया पूर्ण केला. लहान वयात अझरने पायी दिंडीत दाखवलेले धैर्य, चिकाटी आणि वारकरी भावनेप्रती असलेला आदर पाहून अनेक वारकरी त्याचे विशेष कौतुक करत होते. सय्यद आणि पठाण या दोन्ही कुटुंबाच्या सक्रिय सहभागामुळे पुणे-मुंबई येथील ज्ञात मित्रपरिवारातील त्यांचे सहकारी वारकरी भारावून गेले. कर्जत तालुक्यातील या दोन मुस्लिम कुटुंबांच्या सहभागाने सामाजिक ऐक्याचे सुंदर उदाहरण घडवले असून, अवघ्या १० वर्षांच्या अझरच्या जिद्दीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर यांचे न्यायालय**
अर्जदार- **श्रीम. शारदा दत्तात्रय गायकवाड, रा. कोहकडी - राळेगण थेरपाळ, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.**
**विरुध्द**
ग्रामपंचायत कार्यालय **पांढरकरवाडी-निघोज,**
ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

**विषय-** जन्म - मृत्यु नोंदी सुधारणा अधिनियम, २०२३ च्या अनुषंगाने जाहीर प्रगटन प्रसिध्द करणे बाबत.

ज्याअर्थी, अर्जदार **श्रीम. शारदा दत्तात्रय गायकवाड, (लग्नाअगोदरचे नाव- शारदा शिवाजी भुकन), रा. कोहकडी - राळेगण थेरपाळ,** ता. पारनेर, जि. अहिल्यानगर यांनी **स्वतःच्या जन्म** नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधीत निबंधकाने **त्यांच्या जन्म** नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे. **त्यांच्या स्वतःच्या जन्माची** तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | शारदा शिवाजी भुकन | स्वतः | १/६/१९८० |

निबंधकांनी दिलेल्या जन्म / मृत्यु नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायानुसार सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविणेत येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या **स्वतःच्या जन्म** नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही तर सबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २९/०६/२०२६** रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहीर प्रगटन दिले आहे.

सही/-
शिक्का
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पारनेर**

**प्रो. फी. जमा.रु.**
**पान न.**
चौ. अ.नं. १२७/२०२६

**सायटेशन नोटीस**

दि. ०३/०७/२०२६

**पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात**
**अर्जदार- श्री. संदिप माधव शिदोरे रा सोमठाणे खुर्द ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर**
**सामनेवाला- ग्रामपंचायत कार्यालय सोमठाणे खुर्द, ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर**

सदर अर्जदार हा मौजे सोमठाणे खुर्द ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथील रहिवाशी आहेत. सदर अर्जदार यांचा मुलगा नामे श्रीकर संदिप शिदोरे यांचा जन्म मौजे सोमठाणे खुर्द ता. पाथर्डी जि.अहिल्यानगर येथे २०-१०-२०१५ रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय सोमठाणे खुर्द येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय सोमठाणे खुर्द यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे सोमठाणे खुर्द जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय सोमठाणे खुर्द ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत सोमठाणे खुर्द ता.पाथर्डी येथे जावुन जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेबाबत १०-०६-२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय सोमठाणे खुर्द ता.पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायच्या व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदारास त्यांचे मुलगा नामे श्रीकर संदिप शिदोरे जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक- ०३ /०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

**हुकुमावरुन**
शिक्का
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी, पाथर्डी**

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

मंगळवार दि.१४ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


# डॉ. सुजय विखे यांच्या मध्यस्थीने शिर्डीतील १२ चारीचा प्रश्न निकाली



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : विखे परिवाराची भावना ही कायम शेतकऱ्यांच्या बाजूने राहीली असून शिर्डीतील जनतेला काय हवय त्याच बाजूने आम्ही आहोत. शिर्डीतील जनतेच्या भावना डावलून आम्ही कधीच विरोधी निर्णय घेणार नाही अशा स्पष्ट भूमिका डॉ सुजय विखे यांनी घेतल्याने १२ चारीचा संघर्षाला पुर्णविराम मिळाला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून १२ चारी वरील नागरीक व नगरपालिका प्रशासन यांच्यात चारी बंदीस्त करून रस्ता करण्याच्या मुद्यावरुन संघर्ष पेटला होता. १२ चारी वरील नागरिकांनी या भागासाठी वरदान ठरलेली चारी भूमिगत करू नये यासाठी नगर पालीका प्रशासना विरोधात शड्डू ठोकला होता.

या मागणीचे निवेदन देत पालिकेवर मोर्चा काढला होता. तसेच राहाता न्यायालयात हे काम होऊ नये म्हणून खटला दाखल केला होता. परंतू मुख्याधिकारी सतिश दिघे यांनी नागरिकांच्या म्हणण्याला प्रतिसाद न दिल्याने नागरिकांच्या भावना तिव्र होत मुख्याधिकारी 'सतिश दिघे चले जाव'चा नारा देण्यात आला होता व कोणत्याही परिस्थितीत काम करू देणार नाही अशी भूमिका स्थानिकांनी घेतल्याने अखेर ते काम बंद करण्याचा निर्णय उपनगराध्यक्ष अभय शेळके यांच्या मध्यस्थीने घेण्यात आला होता . काही दिवस हे काम शांत असताना ठेकेदाराने चारीतील नळ्यावर मुरुम टाकण्याचा प्रयत्न झाला असता सोसायटी चे माजी अध्यक्ष आप्पासाहेब कोते, मा संचालक विनायक कोते, अक्षय कोते, प्रकाश कोते यांनी जोरदार आक्षेप घेत मुख्याधिकारी दिघे वर तोफ डागली होती.

यावर उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी तीव्र नाराची व्यक्त करत दिघे यांचे वर खालच्या पातळीत बोलण्यावरून पत्रकार परिषद घेत त्या वक्तव्याचा निषेध करत असा प्रकार खपवून घेणार नाही अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे हे प्रकरण आणखीनच चिघळत चालले होते. अखेर या वादावर निर्णय घेण्यासाठी डॉ सुजय विखे यांनी मध्यस्थी काढत शिर्डी च्या जनतेच्या ज्या भावना असतील त्याच प्रकारे निर्णय घेण्यात येईल असा निर्वाळा देत १२ चारीचा प्रश्न निकाली काढला आहे. याप्रसंगी प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते, नगराध्यक्ष जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, अमित शेळके, गणेश सोनावणे, नगरसेवक निलेश कोते, अरविंद कोते, सुधीर शिंदे, सोसायटीचे मा.अध्यक्ष आप्पासाहेब कोते, मा संचालक विनायक कोते, अक्षय कोते, प्रकाश कोते नानासाहेब शिंदे मुख्याधिकारी सतिश दिघे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळीभानमध्ये चोऱ्यांचा सुळसुळाट

## पोलीस यंत्रणेच्या निष्क्रियतेविरोधात नागरिकांमध्ये संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मोठी बाजारपेठ, आठवडी बाजार आणि राज्य मार्गावरील महत्त्वाचे गाव असूनही येथील पोलीस दूरक्षेत्र कायम बंद असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. कर्मचारी नसल्याने परिसरात प्रभावी पोलीस बंदोबस्त नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

गेल्या काही दिवसांत शेळ्या चोरी, घरफोडी, दुचाकी चोरी, मोबाईल चोरी तसेच शेतकऱ्यांच्या मोटार पंपांच्या केबल चोरीच्या घटना वारंवार घडल्या आहेत. दाभाडे वस्ती, खिर्डी रोड आणि इतर परिसरात रात्रीच्या वेळी चोरट्यांचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अनेक गुन्ह्यांचा अद्याप तपास लागलेला नसल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

टाकळीभान हे संवेदनशील गाव असून येथे मोठी लोकसंख्या, आठवडी बाजार, वाहतुकीची वर्दळ आणि विविध कायदा-सुव्यवस्थेच्या घटना घडण्याची शक्यता कायम असते. अशा परिस्थितीत नियमित रात्रीची गस्त नसल्याने चोरट्यांचे मनोबल वाढत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. मध्यरात्री गस्तीची पोलीस गाडी नियमित सुरू करावी आणि संशयितांवर प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

टाकळीभान पोलीस दूरक्षेत्र कायमस्वरूपी सुरू करावे, किमान दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नियमित नेमणूक करावी, मध्यरात्रीची पोलीस गस्त दररोज सुरू करावी, प्रलंबित चोरीच्या गुन्ह्यांचा तातडीने तपास करून आरोपींना अटक करावी, अशी नागरिकांची प्रमुख मागणी आहे.

ग्रामस्थांनी अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि जिल्हा पोलीस प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन टाकळीभानमध्ये कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रभावी पावले उचलावीत, अशी कळकळीची मागणी केली आहे.

# घरासमोरून दुचाकी चोरीला




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगाव-कोल्हार रस्त्यावरील मुसमाडे वस्ती येथे रविवारी (दि.१३) मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घरासमोर पार्क केलेली दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली. या धाडसी चोरीमुळे उक्कलगाव आणि परिसरात वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उक्कलगाव-कोल्हार रस्त्यावरील मुसमाडे वस्ती येथे राहणारे अभिजित नारायण मुसमाडे यांनी रविवारी रात्री त्यांची होंडा कंपनीची काळ्या रंगाची युनिकॉर्न दुचाकी क्र. एम एच १७ सी एफ २९९९ नेहमीप्रमाणे घरासमोर पार्क केली होती. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी या संधीचा फायदा घेत लॉक तोडून दुचाकी चोरून नेली. सोमवारी सकाळी हा प्रकार उघडकीस आला. या चोरीप्रकरणी वाहनमालक अभिजित नारायण मुसमाडे यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पुढील तपास चालू आहे.

# केबल चोरी करताना दोघे रंगेहात जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील लाख शिवारात शेतातील बोअरवेलची केबल चोरी करताना दोन युवकांना शेतकऱ्यांनी रंगेहात पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना शनिवारी (११ जुलै) पहाटे घडली. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी दोघांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबासाहेब नाथा कलवार (वय ४५, रा. लाख) हे राजेंद्र कांतीलाल चुत्तर यांच्या शेतात गेल्या २५ वर्षांपासून शेती करीत असून ते तेथेच वास्तव्यास आहेत. ११ जुलै रोजी पहाटे दोनच्या सुमारास बाबासाहेब कलवार व सचिन माळी हे शेतात फेरफटका मारत असताना रस्त्याच्या कडेला एक मोटारसायकल उभी असल्याचे दिसले. संशय आल्याने त्यांनी पाहणी केली असता दोन युवक बोअरवेलची वीज केबल कापताना आढळले. दोघांना जागीच पकडून चौकशी केली असता त्यांनी सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर कलवार यांनी तातडीने राहुरी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही संशयितांना चोरीसाठी वापरलेल्या साहित्यांसह ताब्यात घेतले. याप्रकरणी ऋषीकेश मुकेश गोहेर (रा. भारतनगर, राहुरी) आणि निलेश सुनील तुजारे (रा. मुलानमाथा, राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# संदीप घुगे गोळीबार हल्ला प्रकरणातील आरोपी अद्याप फरार

## पोलीस प्रशासनाची भूमिका संशयास्पद !



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील मालुंजे गावचे माजी सरपंच संदीप भाऊसाहेब घुगे यांच्यावर दि. १ जुलै रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास हल्लेखोरांनी गोळीबार करून प्राणघातक हल्ला केला होता. घराचा दरवाजा बंद केल्याने मोठा अनर्थ टळला व सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही. मात्र, घुगे कुटुंब व परिसर दहशतीखाली आहेत.

सदर घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, संगमनेर तालुका पोलीस निरीक्षक प्रविण साळुंके तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, घटनेला पंधरा दिवस उलटूनही या प्रकरणातील आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागले नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी मालुंजे ग्रामस्थांनी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यासमोर एकदिवसीय ठिय्या आंदोलनही केले. तरीही तपासात अपेक्षित प्रगती झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, आमदार अमोल खताळ पाटील यांनी संदीप घुगे यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांची विचारपूस केली आणि तपासाचा आढावा घेतला. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी पोलीस निरीक्षक व संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच तपासाबाबत विविध शंका उपस्थित करत निष्पक्ष चौकशीची मागणी केली.

यावर आमदार अमोल खताळ पाटील यांनी पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, आरोपींना लवकरात लवकर अटक केली जाईल अशी ग्वाही दिली. अशा गंभीर घटनांची गांभीर्याने दखल घेतली जाईल, कायद्याच्या चौकटीत कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही तसेच तपासाला गती मिळावी यासाठी आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# नाशिक-पुणे हायवेवर चोरट्यांचा 'स्टील'वर डोळा

## हॉटेल 'साई प्रसाद'मधून २१ हजारांचे साहित्य लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : नाशिक-पुणे महामार्गावरील हॉटेल्स आता चोरट्यांच्या निशाण्यावर आल्याचे दिसत असून, नांदुर खंदरमाळ शिवारातील (१९ मैल) प्रसिद्ध 'साई प्रसाद फॅमिली रेस्टॉरंट'मध्ये एक अजब चोरीची घटना घडली आहे. चोरट्यांनी हॉटेलचा गल्ला किंवा महागडे साहित्य सोडून, चक्क हॉटेलबाहेर ठेवलेली १५ हजार रुपये किमतीची स्टीलची मांडणी (रॅक) आणि पाण्याची मोटार चोरून नेली आहे. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



हॉटेल व्यावसायिक संजय देवराम टपाल (वय ४८, रा. कोठे खुर्द, ता. संगमनेर) हे गेल्या वर्षभरापासून हायवेलगत हे हॉटेल चालवतात. नेहमीप्रमाणे ७ जुलै रोजी रात्री ९ वाजता त्यांनी हॉटेल बंद केले आणि ते गावी गेले होते. हॉटेलच्या समोरील आवारात दैनंदिन वापराचे किचन साहित्य व इलेक्ट्रिक बोर्ड ठेवलेला होता.

मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने या शांततेचा फायदा घेत हॉटेलच्या आवारातून १५,००० रुपयांची स्टीलची मांडणी, ५,००० रुपयांची १ एचपी इलेक्ट्रिक पाण्याची मोटार, लोखंडी बाकडा, इलेक्ट्रिक बोर्ड आणि ५० फूट केबल असा एकूण २१,९०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ८ जुलै रोजी सकाळी ७ वाजता संजय टपाल हॉटेल उघडण्यासाठी आले असता हा प्रकार उघडकीस आला. त्यांनी परिसरात शोध घेतला, मात्र साहित्य मिळून आले नाही. अखेर त्यांनी पोलिसांत धाव घेतली. संजय टपाल यांच्या फिर्यादीवरून घारगाव पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

घारगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाबुराव गोडे पुढील तपास करत आहेत. महामार्गावर रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी आता स्थानिक हॉटेल व्यावसायिकांमधून होत आहे.

# लग्नासाठी दबाव टाकत अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग; पॉक्सो दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील कृषी विद्यापीठ परिसरात एका १७ वर्षीय अल्पवयीन महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर लग्नासाठी दबाव टाकत विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तसेच दुसऱ्याशी विवाह केल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी राहुरी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता व पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२५ मध्ये महाविद्यालयातून घरी जात असताना आरोपी ओंकार प्रभाकर उर्फ महम्मद वैरागर (रा. ब्राम्हणी, ता. राहुरी) याची पीडित विद्यार्थिनीशी ओळख झाली होती. त्यानंतर ११ मार्च २०२६ रोजी बारावीच्या परीक्षेसाठी राहुरी कृषी विद्यापीठ परिसरात आलेल्या विद्यार्थिनीला आरोपीने चारचाकी वाहनात बसवून तिचे फोटो काढले. त्यानंतर तिचा हात पकडून अश्लील वर्तन करत विनयभंग केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. त्यानंतर आरोपीने वारंवार फोन करून लग्नासाठी दबाव टाकला. माझ्याशी लग्न कर, अन्यथा तुला व तुझ्या कुटुंबाला जीवे मारून टाकीन, अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. तसेच पीडितेच्या नातेवाईकांना फोन करून तिचे लग्न मोडण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी ओंकार प्रभाकर उर्फ महम्मद वैरागर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४, ३५१(२), ३५२ तसेच पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा (क्र. ७७७/२०२६) दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# वृद्ध दांपत्याचे तोंड दाबून सव्वादोन लाखांची जबरी चोरी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : तरुण वयात ज्या थकलेल्या हातांनी आयुष्यभर कष्ट उपसले, त्याच ८० वर्षांच्या माउलीला आणि त्यांच्या वृद्ध पतीला मध्यरात्री घरात घुसून ओलीस धरत लुटल्याची धक्कादायक घटना संगमनेर तालुक्यात घडली आहे. जांबुत खुर्द (म्हसोबाची वाडी) शिवारात तीन अज्ञात चोरट्यांनी चाकूचा धाक दाखवून सव्वादोन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम बळजबरीने लंपास केली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सखुबाई लहानु पारधी (वय ८०, रा. जांबुत खुर्द, म्हसोबाची वाडी) या त्यांचे पती लहानु पारधी यांच्यासह जुन्या माडीच्या घरात राहतात. बुधवारी (दि. ८) मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास हे दांपत्य गाढ झोपेत असताना, तीन अज्ञात चोरट्यांनी घराचा दरवाजा ढकलून आत प्रवेश केला. अचानक सखुबाई यांना जाग आली असता, ३० ते ३५ वयोगटातील एका तोंडाला कापड बांधलेल्या चोरट्याने त्यांच्या पतीचे तोंड दाबून धरल्याचे दिसले. सखुबाई यांनी 'ए बाबा, हे काय करतोय?' म्हणून विचारताच, इतर दोन चोरट्यांनी सखुबाई यांचेही तोंड दाबले. त्यानंतर गळ्यातील सोन्याची पोत, चार पुतळ्या, सोन्याचे डोरले आणि उशाशी असलेली रोख रक्कम असा एकूण २ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी बळजबरीने ओरबाडून घेतला. सखुबाई यांनी धाडसाने आरडाओरडा केल्यावर शेजारी राहणारे वाटेकरू शिवाजी बिडकर हे मदतीसाठी धावून आले. मात्र, चोरट्यांपैकी एकाने बिडकर यांच्यावर थेट चाकू उपसून जीवे मारण्याची धमकी दिली आणि तिघेही अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. या प्रकरणी सखुबाई पारधी यांच्या फिर्यादीवरून घारगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०९(४) व ३३३ अन्वये तीन अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब बोरसे या घटनेचा पुढील तपास करत आहेत. ग्रामीण भागातील वृद्ध दांपत्यांना टार्गेट करणाऱ्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, पोलिसांसमोर चोरट्यांना पकडण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# शेतातील रस्त्याच्या वादातून कोंबड्यांवर विषप्रयोग; पती-पत्नीवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : संगमनेर तालुक्यातील जांबुत बुद्रुक येथे शेतातील रस्त्याच्या जुन्या वादातून शेजाऱ्याच्या पाळीव कोंबड्यांना विषप्रयोग करून ठार मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी घारगाव पोलिसांनी पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी प्रकाश गुलाब देवकाते (वय ३७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते शेतीसोबत गावरान कोंबड्यांचे पालन करतात. रविवारी (१२ जुलै) नेहमीप्रमाणे कोंबड्या चरण्यासाठी सोडल्या होत्या. सायंकाळी केवळ तीन कोंबड्या खुराड्यात परतल्याने त्यांनी शोध घेतला असता शेजारी महेंद्र सतु कुलाळ यांच्या घरासमोरील मोकळ्या जागेत सात कोंबड्या मृतावस्थेत आढळून आल्या. त्यांना विषारी पदार्थ खाऊ घालण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. उर्वरित आठ कोंबड्या अद्याप बेपत्ता असून त्यांचाही मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शेतातील रस्त्याच्या वादातून महेंद्र कुलाळ व त्यांच्या पत्नी राधिका कुलाळ यांनी हा प्रकार केल्याचा आरोप फिर्यादीने केला असून, या घटनेत सुमारे साडेचार हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत कलम ३२५ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई रामभाऊ भुतांबरे पुढील तपास करीत आहेत.

# राहुरी तालुक्यातून अल्पवयीन मुलगी बेपत्ता; अपहरणाचा गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील कुक्कडवेढे परिसरातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून, अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याच्या संशयावरून राहुरी पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आपल्या कुटुंबासह कुक्कडवेढे परिसरात वास्तव्यास आहे. १० जुलै रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास ती घरी एकटी असताना अचानक बेपत्ता झाली. कुटुंबीयांनी परिसरात तसेच नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला. मात्र, ती आढळून न आल्याने अज्ञात व्यक्तीने फूस लावून तिला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १३७(२) अन्वये अपहरणाचा गुन्हा (क्र. ७७३/२०२६) दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

# फोनवर बोलण्यास नकार दिल्याने महिलेच्या पतीला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी**: तालुक्यातील उंबरे येथे एका महिलेने फोनवर बोलण्यास नकार दिल्याचा राग मनात धरून आरोपीने तिच्या पतीला मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी राहुरी पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जुलै रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास पीडित महिला घराबाहेर असताना आरोपी ईश्वर आण्णासाहेब आडसुरे (रा. उंबरे, ता. राहुरी) याने तिच्याकडे माझ्यासोबत फोनवर बोलत जा, असे म्हणत शिवीगाळ केली. दुसऱ्या दिवशी सकाळी महिलेचे पती शेतात जात असताना त्यांनी आरोपीला पत्नीला त्रास देऊ नये, असे सांगितले. त्यावेळी आरोपीने त्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर ९ जुलै रोजी सायंकाळी आरोपीने पुन्हा महिलेच्या पतीला अडवून लोखंडी दाताळाने मारहाण केली. तसेच तुझी सुपारी देऊन तुझा काटा काढीन, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर पीडित महिलेने राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपी ईश्वर आण्णासाहेब आडसुरे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११८(१), ३५१(३) व ३५२ अन्वये गुन्हा (क्र. ७७१/२०२६) दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.